महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३८

# महाराजा सयाजीराव
# आणि
# ज्ञानमार्गी जगप्रवास

दिनेश पाटील



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३८

# महाराजा सयाजीराव आणि ज्ञानमार्गी जगप्रवास

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव आणि
ज्ञानमार्गी जगप्रवास
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - ५८
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
प्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ८१ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# आणि
# ज्ञानमार्गी जगप्रवास

ब्रिटीश आगमनानंतर वेगवेगळ्या कारणाने भारतीयांचे परदेश पर्यटन सुरु झाले. यातील पहिल्या टप्प्यात शिक्षणाच्या निमित्ताने भारतीयांच्या युरोपवाऱ्या सुरु झाल्या. ब्रिटीश साम्राज्य, अमेरिकन आणि युरोपियन मिशनरी यांनी परदेशवाऱ्यांना प्रेरणा आणि बळ दिले. परदेशी लोकांनी भारताला भेट देऊन या प्रवासाचे वृत्तांत लिहून ठेविले आहेत. आज आपण अशा लेखनाकडे ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणून पाहतो. प्रवास माणसाला शहाणा करतो हे आपण अगदी दैनंदिन प्रवासातूनदेखील अनुभवलेले असते. हा प्रवास आपल्याला खऱ्या अर्थाने शहाणे तेव्हाच करतो जेव्हा आपण आपल्या मातृभूमीपासून जास्तीत-जास्त दूरचा प्रवास करतो. साधारण: १८८० च्या दशकानंतर आपल्याला भारतीयांच्या परदेशी प्रवासाचे लेखन उपलब्ध आहे. ती प्रवासलेखने चाळली असता परदेशात आपण काय पाहिले याची वर्णने आणि त्या देशांची भलावना करणारी  अशीच प्रवास लेखने आपल्याला जास्त आढळतात.

परंतु अशा लेखनामध्ये परदेशाचे आपल्या देशाशी तुलना करून केलेले चिंतन अपवादानेच आढळते. या सर्व पार्श्वभूमीवर भारतातील राज्यकर्त्यांचा परदेश प्रवास विचारात घेतला तर एक बाब प्रकर्षाने जाणवते ती अशी की भारतीय राज्यकर्त्यांनी केलेले परदेश प्रवास तुलनेने कमी आहेत. त्यातही एखाद्या शासनकर्त्याने भरपूर परदेश प्रवास केला असेल तर त्या प्रवासाच्या नोंदी, अहवाल किंवा स्वतंत्र लेखन अतिशय नगण्य आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या २६ जगप्रवासाचे अहवाल महाराजांच्या शिस्तबद्ध दस्ताऐवजीकरणामुळे आज उपलब्ध आहेत. हे अहवाल इतिहासाची प्राथमिक साधने म्हणून मौलिक ठेवा आहेत. महाराजांनी ते छापून घेतले होते. एकतर महाराजांएवढा जगप्रवास आणि तोही अभ्यासू वृत्तीने एखाद्या प्रशासकाने केल्याचे दुसरे उदाहरण सापडत नाही. पंडित राहुल सांस्कृतायन यांच्यासारखा बौद्ध विद्वान हा भारतीय प्रवासलेखनातील अपवाद ठरेल. कारण भारतातील प्रवासलेखनाचा आढावा घेता राहुल संस्कृतायन यांनी प्रचंडसां प्रवास करून एकूण १९२६ ते १९६० या ३४ वर्षात २२ प्रवास लेखने लिहिली. या सर्व लेखनात त्यांचा भारतातील आणि भारताबाहेरील प्रवास ग्रंथबद्ध झाला आहे.

या पार्श्वभूमीवर जेव्हा आपण महाराजांच्या १८८७ पासून ते १९३८ पर्यंतच्या या २६ जगप्रवासाचा विचार करतो तेव्हा या जगप्रवासांचे अहवाल हा भारतातील प्रवासलेखनाच्या इतिहासातील अशा प्रकारचा बहुधा एकमेव लेखन प्रकार म्हणून आपल्याला विचारात घ्यावा लागतो.

## सयाजीरावांचा जगप्रवास : एक वेगळेपण

महाराजा सयाजीराव हे वयाच्या १२ व्या वर्षी १८७५ मध्ये बडोद्याच्या गादीला दत्तक आले. त्यांचे जन्मगाव नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील कवळाणे हे होते. दत्तक जाईपर्यंत ते निरक्षर होते. एका छोट्या गावात शेतकरी कुटुंबात ज्याप्रकारचे वातावरण असते त्या वातावरणातून थेट राजा होणे हा जसा त्यांच्या जीवनातील 'टर्निंग पॉइंट' होता तसाच प्रचंड मानसशास्त्रीय दबाव निर्माण करणारा टप्पाही होता. १८७५ ते १८८१ या ६ वर्षात त्यांना अक्षरओळख, विविध विषयांचे प्राथमिक ज्ञान आणि राज्यकारभाराचे धडे दिले गेले. १८८१ ला त्यांना राज्याधिकार प्राप्त झाले आणि त्यांचा स्वतंत्र कारभार सुरु झाला. राज्यकारभार हाती आल्यापासून ते आपण कोठेही कमी पडता कामा नये या टोकदार धारणेने काम करत होते. त्यांना मिळालेले शिक्षण फारच तोकडे आहे आणि त्यांना पार पाडायची जबाबदारी मोठी आहे ही जाणीव त्यांच्या राज्यकारभाराच्या पहिल्या टप्प्यात त्यांच्या व्यक्तिमत्वावर ताबा ठेऊन होती.

परिणामी प्रशासकीय जबाबदारी पार पाडत असताना सतत नवे शिकण्याचा ध्यास त्यांनी घेतला. १८८० ला त्यांचा पहिला विवाह झाला आणि पाचच वर्षात त्यांच्या पत्नी चिमणाबाई पहिल्या यांचे निधन झाले.

१८८१ पासून अंगावर पडलेली जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडण्याच्या ध्यासातून केलेले शारीरिक आणि बौद्धिक श्रम, त्याचबरोबर पहिल्या पत्नीचा अकाली मृत्यू याचा परिणाम म्हणून सयाजीरावांना निद्रानाशाचा विकार जडला. भारतात अनेक उपचार करूनही यावर उपाय निघाला नाही. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना हवा पालट आणि उपचार यासाठी युरोपला जाण्याचा सल्ला दिला. त्यातून आरोग्याच्या स्वास्थ्यासाठी महाराज आयुष्यभर परदेश प्रवास करत राहिले. हे जगप्रवास सयाजीरावांच्या बौद्धिक विकासाला, वैश्विक दृष्टीला आणि तुलनात्मक विचार क्षमतेला क्रांतिकारक योगदान देणारे ठरले. त्याचबरोबर सयाजीरावांच्या बडोदा संस्थानाबरोबरच भारताच्या आधुनिकीकरणासाठी आणि विकासासाठीसुद्धा उपकारक ठरले. १८८७ पासून ते १९१५ पर्यंतचे महाराजांचे जगप्रवास बडोद्याला इतर ५६४ संस्थानांबरोबर ब्रिटीश भारताच्या पुढेसुद्धा आदर्श निर्माण करण्याइतके उपकारक ठरले.

महाराजांचे हे २६ परदेश प्रवास डोळ्याखालून घातले तर महाराजांनी परदेशात कोणत्या संस्था, व्यक्ती, ठिकाणे यांना भेटी दिल्या हे कळते. महाराजांनी आपल्या परदेश प्रवासातून

२०० हून अधिक हुजुर हुकूम काढले. १८८७ ते १९०६ या १९ वर्षांत एकूण ६ परदेश प्रवास झाले. या ६ दौऱ्यांमध्ये १९१ हुजूर-हुकुम काढले गेले. हा कालावधी बडोद्याच्या क्रांतिकारक विकासाचा पायाभूत कालखंड होता हे या हुजुर हुकुमांच्या विषय-आशयावरून स्पष्ट होते. हे हुजुर-हुकूम मुख्यत: शिक्षण, शेती, उद्योग, ग्रंथ प्रकाशन, धर्म, आरोग्य, प्रशासकीय सुधारणा, राजकीय सुधारणा इ. शी संबंधित होते.

यावरून महाराजांची आपल्या राज्यकारभारावर किती बारीक नजर होती हे तर स्पष्ट होते. त्याचप्रमाणे आपल्या राज्याच्या विकासासाठी आपल्या परदेश वाऱ्यांचा किती परिणामकारकपणे उपयोग महाराजांनी करून घेतला होता हेसुद्धा सिद्ध होते. सर्वात महत्वाचे म्हणजे महाराजांच्या आरोग्याची स्थिती किती त्रासदायक होती हेही कळते. थोडक्यात महाराजांचे समकालीन इतर राजे परदेशात जाऊन मौजमजा करत असतानाच्या पार्श्वभूमीवर तर महाराज किती आदर्श राज्यकर्ते होते हेही यातून अधोरेखित होते.

## परदेश प्रवास : महाराजांचा दृष्टीकोन

जुलै १८८४ मध्ये बापूसाहेब घाडग्यांच्या गार्डियनशिपखाली संपतराव गायकवाड आणि खासेराव जाधव शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. खासेरावांना शेतीच्या शिक्षणासाठी तर संपतरावांना बॅरीस्टर आणि मिलिटरी शिक्षणासाठी महाराजांनी इंग्लंडला पाठवले. महाराजांमध्ये युरोपबद्दलचे

आकर्षण महाराजांचे गुरु इलियट सर यांच्यामुळे निर्माण झाले होते. सयाजीरावांच्या १८८७ च्या पहिल्या युरोप दौऱ्याचे नियोजन इलियट सरांनीच केले होते. पहिल्या युरोप दौऱ्याचा महाराजांच्या दृष्टीकोनावर फार मोठा परिणाम झाला. या युरोप दौऱ्यात महाराजांनी युरोपातील उद्योग, शेती, शिक्षण, साहित्य, शिल्पकला याबाबतची प्रगती पाहिली आणि या सर्व बाबी आपल्या संस्थानात कशा रुजविता येतील याचा ध्यासच घेतला. पुढे प्रत्येक परदेश वारीनंतर महाराजांनी काहीनाकाही सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणल्या.

महाराज आपल्या परदेश प्रवासाबद्दल मत व्यक्त करताना म्हणतात, 'परदेश पर्यटन करणे हे ज्ञानाचे मुख्य साधन आहे, हे मला पहिल्या विलायत प्रवासाने उमजले. यापुढे जगभर प्रवास करायचा, जगात जे जे चांगलं आहे ते माझ्या बडोद्यांसाठी आणायचे मी ठरविले आहे. या प्रवासानं मला निश्चिंत वाटू लागलं आहे की, आपल्या देशातील उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक शिक्षणाची खास आवश्यकता आहे. यामुळेच परदेशात उद्योगधंद्याची अपार वाढ होत आहे. ते शिक्षण घेण्याकडे आपण लक्ष पुरवावे तितके थोडेच आहे." महाराजांच परदेश प्रवासाबाबतच्या वरील दृष्टीकोनात आपल्याला प्रागतिक बडोद्याची बीजे दिसतात.

महाराज जरी आरोग्यासाठी परदेशवाऱ्या करत राहिले तरी अगदी पहिल्या परदेश दौऱ्यापासूनच शास्त्रीय शिक्षणाचा परदेशी आदर्श त्यांना महत्वाचा वाटत होता असे दिसते. भारतातील तोपर्यंतचे शिक्षण आणि परदेशातील शास्त्रीय शिक्षण यांचा तुलनात्मक विचार ते सतत करत असत. या विचारातच त्यांना आपल्या देशाच्या अधोगतीच्या आणि परदेशातील प्रगतीच्या कारणांचा शोध लागला. यासंदर्भात महाराज म्हणतात, 'हिंदुस्थानात शास्त्रीय शिक्षणाची फार उपेक्षा झालेली आहे, म्हणून आपण आपल्या देशातील माणसांना शास्त्र व कला शिकण्यासाठी परदेशात पाठविले पाहिजे. तेथील पद्धती शिकून येण्याची संधी त्यांना दिली पाहिजे. विशेषतः औद्योगिक शिक्षणाच्या बाबतीत गोष्ट फार अवश्य झाली आहे.

माझ्या अलीकडील युरोप व अमेरिकेतील प्रवाहामुळे मला असे निश्चित वाटू लागले आहे. की, आपल्या देशातील उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी औद्योगिक शिक्षणाची खास आवश्यकता आहे. परदेशात उद्योगधंद्याची जी अपार वाढ होत आहे, ते शिक्षण घेण्याकडे आपण तितके लक्ष पुरवणे आवश्यक आहे. पुढील अनेक वर्षे अथवा पिढ्यांपर्यंत आपल्याकडील तरुण लोकांना युरोप, अमेरिका जपान वगैरे देशात पाठवावे लागेल. त्या देशातील नवीन ज्ञान, नवीन कल्पना व नवीन संस्कृती आपण आत्मसात केली पाहिजे. आपले राष्ट्रीय व सामाजिक ऐक्य साधून उपरोक्त देशातील पुरुषांच्या परिश्रमांचे,

चिकाटीचे व स्वार्थत्यागाचे आपण अनुकरण करावे. बडोद्यातून सरकारी खर्चाने पाठविलेले विद्यार्थी परदेशातून विद्यासंपन्न होऊन परत येतील. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग बडोद्याला होईल.'

महाराजांना त्यांच्या शिक्षण काळात शिक्षकांनी नियमित डायरी लेखनाची सवय लावली होती. मे १९०० मध्ये महाराजांच्या ६ व्या युरोप दौऱ्यादरम्यान लिहिलेल्या डायरीतील मजकूर महाराजांच्या परदेश प्रवासाबाबतच्या दृष्टीकोनावर प्रकाश टाकणारा आहे. हा प्रवास कसा फायदेशीर ठरतो या संदर्भातील नोंदी वाचणे मनोरंजक ठरेल. मे १९०० मधील हा नमुना म्हणूनच पुढे दिला आहे.

## डायरीतील काही पाने-युरोप ट्रिप सहावी, मे १९००

"या डायरीतल्या पानात १९०० पर्यंत मी केलेल्या पाच ट्रीप संबंधीच्या नोंदी केलेल्या आहेत. या नोंदीतील माझी निरीक्षणं वेगवेगळा कालखंड, ऋतुमान आणि वेगवेगळ्या प्रवासाबद्दल आहेत.

### १. प्रशासकीय व्यवस्था

जेव्हा एखाद्या राजास परदेशात जावयाचे झाल्यास त्यास आपल्या रेसिडेंटमार्फत भारत सरकारला याबद्दल आगाऊ कळवावे लागते. राजाचे परदेशात जाणे हे सुरुवातीस वरिष्ठ सरकारला कळविणे होते; पण अलीकडे हळूहळू या पद्धतीत रजेवर जाण्यासारखा बदल झाला आहे. पोलिटिकल डिपार्टमेंटच्या

वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मनात राजाच्या परदेश गमनाबद्दल संशय येत गेल्याने या प्रवासाच्या कारणांची तपासणी सुरू झाली. प्रवासाचा दर्शविलेला हेतू खरा आहे काय, हे तपासणे सुरू झाले. राजाच्या गैरहजेरीत राज्यप्रशासनाची व्यवस्था काय? यातून वरिष्ठ सरकारचे अप्रत्यक्ष दबाव सुरू होऊ लागले. राजाने परदेश प्रवासात सरकारचा पोलिटिकल ऑफिसर बरोबर न्यावा, असे बंधन सुरू झाले. खरे तर या राजकीय अधिकाऱ्याची प्रवासात काहीच मदत होत नाही. उलट त्यांची सोबत म्हणजे फालतू संगत आणि खर्चाची नासाडी होय. त्यांच्यामुळे प्रवासाचा कोणताही चांगला हेतू साध्य तर होत नाही; परंतु राजाच्या मनात चीड आणि संतापच निर्माण करतात. राजाच्या खर्चाने सोबत असलेल्या राजकीय अधिकाऱ्यांच्या आवडीनिवडी सांभाळण्याचे काम डोकेदुखीच होऊन बसते.

२. प्रवासामुळे राज्यातील गैरहजेरी

परदेश प्रवासाच्या निमित्ताने बडोद्यापासून दीर्घकाळ मी दूर राहणे माझ्या प्रजेला न आवडणारी गोष्ट आहे. प्रकृती अस्वास्थ्य हे माझ्या प्रवासाचे मूळ कारण आहे. प्रवासाने माझ्या प्रकृतीत सुधारणा होते आणि नव्या उत्साहाने प्रजेची कामे करू लागतो. सुरुवातीस काळ्या पाण्याच्या प्रवासाच्या अनिष्ट भीतीने माझ्या सोबत येण्यास नकार देणारेही परदेश प्रवासास उत्सुक आहेत. यात काही निरक्षर आप्तही आहेत. विलायत बघण्याच्या ओढीने अलीकडे काहीजण स्वतःच्या खर्चानेही येण्यास तयार

आहेत. हा बदल मला महत्त्वाचा वाटतो. विलायतेत जाणे अशुभ अथवा अनिष्ट नाही, हा बदलही चांगला आहे. यामुळे दुसऱ्या जगाच्या संस्कृतीची ओळख होईल. १८८७ ला आम्ही पहिली विलायतवारी केली, त्यामुळे आमच्या मातृश्री, काक्या आणि वडीलधाऱ्या मंडळींनी चिंता आणि भीतीने घेरलेल्या अवस्थेत मला निरोप दिला. त्यावेळी अनोळखी देशासंबंधीचे अज्ञान, अंधश्रद्धातील भीतीच चेहऱ्यावर दिसत होती. काळ्या पाण्यावरून जाणारे परत येण्याची शक्यता कमी, तेथे काय खाणार? तिथली माणसे कशी आहेत ? एक ना अनेक शंकांनी ही मंडळी मुकी झाली होती.

रेल्वेस्टेशनवर निरोप देण्यासाठी आलेले अधिकारी, मानकरी, कारभारी आणि जनसमूहाच्या चेहऱ्यावरचे दुःख आणि काळजी बघून मला 'दुरावा हेच गोड दुःख' या शेक्सपिअरच्या वचनाची आठवण झाली. काहींच्या डोळ्यातील अश्रू आणि चेहऱ्यावरचे दुःख राजासंबंधीच्या काळजीयुक्त प्रेमाचे दर्शन झाले. रेल्वेने बडोदा स्टेशन सोडले आणि मी सर्वांचा जडअंतःकरणाने निरोप घेतला.

प्रकृती स्वास्थ्यासाठी पुढे वारंवार दीर्घकाळ मला युरोपला जावे लागले. मात्र यावर्षी बडोद्याला दुष्काळाने घेरले असताना उपचारासाठी युरोपला जायला मन धजत नव्हते. दुष्काळाने भाजून निघालेल्या प्रजेसाठी आम्ही मदत सुरू केली. दुष्काळी कामांना वेग आला. मदत केंद्र सुरू केले. अवर्षणग्रस्त प्रजेची

मदत करण्याचे हुकूम आणि व्यवस्था अधिकाऱ्यांवर सोपवून जडअंत:करणाने, प्रकृती कारणाने बडोदा सोडावे लागत आहे. पाऊस पडेपर्यंत जनतेला मदत करणे आमचे काम आहे, ती कामे मार्गी लावून मी जात असलो तरी माझे लक्ष बडोद्याकडेच लागून राहिले आहे.”

महाराजांच्या डायरीतील वरील नमुना वाचला असता महाराजांच्या परदेश वाऱ्यांबाबत ब्रिटीशांचा संशय व्यक्त होतो. त्याचप्रमाणे परदेश प्रवासामुळे राज्यात गैरहजर राहणे हे महाराजांसाठी वेदनादायी होते हेही जाणवते. दुष्काळ दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर नाइलाजाने प्रकृती स्वास्थ्यासाठी महाराजांना परदेशी जावे लागले. परंतु दौऱ्यावर जाण्याअगोदर दुष्काळ व्यवस्थापनाची तयारी करून, अधिकाऱ्यांना सूचना देऊन जरी महाराज परदेशात गेले तरी त्यांचे पूर्ण लक्ष मात्र बडोद्यातील दुष्काळावर होते हे वाचताना त्यांच्यातील संवेदनशील राजाचे दर्शन घडते.

२१ डिसेंबर १९३६ ला महाराजांनी त्यांचे सचिव मि. न्युहॅम यांनी नायब हुजुर कामदार व्ही.पी. नेने यांना महाराजांची त्यांच्या २५ परदेश दौऱ्यांवरील ग्रंथलेखनाची इच्छा असल्याचे कळवले. त्यानुसार १८८७ ते १९०६ या कालावधीतील परदेश प्रवासावरील ‘सुरुवातीच्या जगप्रवासाच्या नोंदी  भाग - १’ हा ग्रंथ १९३८ मध्ये प्रकाशित झाला.

ही इच्छा महाराजांनी पुढील शब्दात व्यक्त केली होती. 'महाराजांची अशी इच्छा आहे की, एका वर्षात मी २५ वेळा युरोपच्या केलेल्या प्रवासाबाबत लिखाण करायचे असून त्यात त्यांना तुमची मदत असावी असे त्यांना वाटते. या लिखाणातून केवळ त्यांचे व्यक्तिमत्त्व व्यक्त व्हावे असे नसून कार्यालयीन व अर्ध कार्यालयीन इतिहासही त्यातून स्पष्ट व्हावा असे त्यांना वाटते. हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा असून त्यात तुम्हालाही आवड आहे असे मी त्यांना कळवले आहे.'

महाराजांना आपल्या परदेश दौऱ्यावरील पुस्तकात त्यांच्या व्यक्तिमत्वाबरोबर या परदेश दौऱ्यात त्यांनी केलेल्या प्रशासकीय आणि संलग्न कामाचा इतिहासही नोंदविला जावा असे वाटत होते. १९३६ ला महाराजांनी ही इच्छा व्यक्त केल्यानंतर आज ८३ वर्षांनी आपण जेव्हा महाराजांची ही भूमिका आणि त्याप्रमाणे तयार झालेला ग्रंथ यांचा विचार करतो तेव्हा महाराजांच्या दुरदृष्टीचे कौतुक वाटते. कारण राज्यकर्त्यांच्या परदेश दौऱ्यांच्या इतक्या काटेकोर नोंदी ठेवल्याचे दुसरे उदाहरण भारतात सापडत नाही. महत्वाचे म्हणजे महाराजांचे हे जगप्रवासाचे अहवाल महाराजांचे चरित्र आणि बडोद्याच्या प्रगतीचा इतिहास समजून घेण्याचे आज महत्वाचे समकालीन साधन म्हणून महत्वाचे ठरतात.

या प्रस्तावित ग्रंथाच्या आराखड्याबाबत संपादक व्ही.पी. नेने यांनी महाराजांकडे मार्गदर्शन मागितले असता २३ जानेवारी १९३७ च्या पत्रात महाराजांचे सचिव न्युहॅम यांनी नेनेंना पुढील अपेक्षा कळविल्या. 'या ग्रंथास दैनंदिनी अथवा रोजनिशीचे रूप द्यावयाचे नाही. माझ्या आणि महाराजांच्या विचारात जी योजना आहे ती अशी की, योग्य त्या आकारातील प्रकरणांमधून प्रवासाचा वृत्तांत असा मांडावा की ज्यामधून महाराजांना मिळालेला नवा दृष्टिकोन दिसावा, रोचक प्रसंगांचे वर्णन यावे आणि महत्त्वाचे म्हणजे या लिखाणातून महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ शासनकर्ता किंवा प्रशासक म्हणून मुखर न होता. त्यांच्यातील निखळ माणूस वाचकाच्या दृष्टीस यावा. हे काम किती अवघड आहे हे मला माहीत आहे पण येणाऱ्या भावी पिढीसाठी ते फार लाभदायक आहे हे तितकेच खरे.'

ग्रंथाच्या आराखड्याबाबत व्यक्त केलेल्या अपेक्षा फारच मुलभूत आहेत. कारण या ग्रंथातून महाराजांच्या दृष्टीकोनाच्या विकासाला परदेशप्रवासाने काय दिले हे स्पष्ट व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली आहे. यामागील महाराजांची भूमिका फारच व्यापक असावी. परदेश प्रवास हा ज्ञानमार्गी असावा, त्यातून व्यक्तीमत्वात सकारात्मक बदल व्हावेत, आपला देश धर्म संस्कृतीकडे वैश्विक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा हा ग्रंथ वाचणाऱ्याला मिळावी असा

दृष्टीकोन व्यक्त होतो. ग्रंथाच्या आराखड्यात व्यक्त केलेल्या अपेक्षांमध्ये अजून एक महत्वाचा घटक येतो तो म्हणजे महाराजांची ओळख एक ‘निखळ माणूस’ म्हणून या ग्रंथातून व्हावी. ही अपेक्षा फारच महत्वाची आहे. कारण एखादी व्यक्ती राजा असली तरी पहिल्यांदा ती माणूस असते. राजाकडे अतिरेकी लक्ष दिल्यामुळे त्याच्यातील माणसाच्या आकलनाकडे पूर्ण दुर्लक्ष होते. परिणामी त्याचे व्यक्तिमत्व समजून घेण्यामध्ये तसेच त्याचे मूल्यमापन करून निष्कर्ष काढण्यामध्ये आपण कमी पडतो. महाराज प्रत्येक बाबीकडे किती बारकाव्याने आणि तटस्थपणे पाहत होते हे समजून घेण्यासाठी महाराजांनी व्यक्त केलेल्या या अपेक्षा महत्वपूर्ण ठरतात.

महाराजांनी केलेल्या सर्व जगप्रवासांची कालसूची पुढे देत आहोत. ही कालसूची देण्यामागची भूमिका अशी आहे की महाराजांच्या जगप्रवासाचा वाचकांना तुलनात्मक परिचय व्हावा. प्रत्येक जगप्रवासाचा कालावधी, महाराजांनी भेट दिलेले देश यांचा अंदाज यावा.

## महाराजा सयाजीराव : जगप्रवासाची कालसूची

| अ. क्र. | देश | निघाल्याची तारीख | परत आल्याची तारीख | कालावधी (महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्लंड | ३१.०५.१८८७ | २०.०२.१८८८ | ८ म. २० दि. |
| २ | स्वित्झर्लंड | २६.०६.१८८८ | ०८.१०. १८८८ | ३ म. १२ दि. |
| ३ | इंग्लंड, नॉर्वे व जर्मनी | ०७.०५.१८९२ | ०३.०१.१९९३ | ६ म. २६ दि. |
| ४ | कार्लसबाद | ०१.०५.१८९३ | २९.१०.१८९३ | ५ म. २८ दि. |
| ५ | इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली (जीनिव्हा, फ्लॉरेन्स), तुर्कस्तान (कान्स्टॉटिनोपल) | १५.१२.१८९३ | १८.०१.१८९५ | १३ म. ३ दि. |
| ६ | फ्रान्स | १९.०५.१९०० | ११.०१.१९०१ | ७ म.२३ दि. |
| ७ | इंग्लंड | ०१.०४.१९०५ | १६.११.१९०६ | २० म.१५ दि. |
| ८ | इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, अमेरिका | ३०.०३.१९१० | १६.१२.१९१२ | ३० म.१७ दि. |
| ९ | चीन, जपान, सॅन्फ्रान्सिस्को, कॅनडा, लंडन | २२.०४.१९११ | १०.११.१९११ | ५ म.१९ दि. |
| १० | इंग्लंड | ०३.०५.१९१३ | ०७.११.१९१३ | ६ म.४ दि. |
| ११ | स्वित्झर्लंड (सेंट मॉरीट्झ) | १८.०५.१९१४ | ०४.१२.१९१४ | ६ म.१४ दि. |
| १२ | इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी सर्व हिंदुस्थान | २३.०९.१९१९ | ०५.०२.१९२० | ५ म.१३ दि. |
| १३ | इंग्लंड | २४.०३.१९२१ | १३.११.१९२१ | ७ म. २१ दि. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | युरोप | ०१.०४.१९२२ | २५.११.१९२३ | १९ म.२५ दि. |
| १५ | युरोप | २६.०४.१९२४ | २०.११.१९२५ | १८ म. २५ दि. |
| १६ | इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड | १३.०३.१९२६ | १९.११.१९२६ | ८ म. ८ दि. |
| १७ | स्वित्झर्लंड | ०९.०४.१९२७ | १३.०१.१९२८ | ९ म. ४ दि. |
| १८ | फ्रान्स, स्वित्झर्लंड, स्वीडन, डेन्मार्क, जर्मनी | ११.०४.१९२८ | २८.१२.१९२८ | ८ म.१७ दि. |
| १९ | युरोप | १६.०३.१९२९ | १०.०१.१९३० | ९ म. २६ दि. |
| २० | युरोप | १५.०३.१९३० | ०९.०२.१९३१ | १० म.२६ दि. |
| २१ | फ्रान्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड, जर्मनी इटली, स्कॉटलँड, | २३.०५.१९३१ | ०५.१२.१९३२ | १८ म.१३ दि. |
| २२ | अमेरिका, शिकागो परिषद | २२.०५.१९३३ | २३.१०.१९३३ | ५ म.३ दि. |
| २३ | लंडन, बर्लिन हिटलर भेट | ०९.०४.१९३४ | ०७.११.१९३५ | १८ म.२९ दि. |
| २४ | युरोप | ११.०४.१९३६ | २४.११.१९३६ | ७ म.१४ दि. |
| २५ | युरोप | १५.१२.१९३६ | ३०.११.१९३७ | ११ म.१७ दि. |
| २६ | युरोप | ११.०३.१९३८ | ३१.१०.१९३८ | ७ म.२० दि. |

**सयाजीरावांनी १८८७ पासून १९३८ पर्यंत एकूण ५१ वर्षांच्या कालावधीत २६ परदेश प्रवास केले. सर्व परदेश दौऱ्यांचा एकत्रित विचार केला तर सयाजीराव २८ वर्षे एवढा कालावधी परदेशात राहिले. १८८१ ला कारभार हाती आल्यापासून १९३९ ला मृत्यूपर्यंत महाराजांनी एकूण ५८ वर्षे राज्यकारभार केला.**

या ५८ वर्षातील २८ वर्षे महाराज परदेशात राहिले तर ३० वर्षे भारतात होते. ५८ वर्षे म्हणजे २१ हजार दिवस. त्यापैकी २८ वर्षे म्हणजे १० हजार १७० दिवस महाराज परदेशात राहीले म्हणजे सयाजीरावांनी त्यांच्या कारकीर्दीचा अर्धा कालखंड त्यांनी परदेशात राहून राज्यकारभार केला. भारताच्या इतिहासातील हे एकमेव उदाहरण असावे. राज्यकर्ता प्रत्यक्ष राज्यात असूनही राज्यकारभार सुरळीत चालत नसतो याची कित्येक उदाहरणे आपण पाहिली आहेत. या पार्श्वभूमीवर अर्धी कारकीर्द परदेशात राहून राज्यकारभार करूनही महाराजांनी आपले राज्य सर्वच आघाड्यांवर सर्वोच्च स्थानी ठेवले. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की महाराजांनी व्यवस्थापन, शिस्त, प्रशासनातील कर्तृत्ववान अधिकारी यांच्या जोरावर आपला कारभार चालवला होता.

## पहिला प्रवास : १८८७

महाराजांचा पहिला जगप्रवास इंग्लंड या देशात झाला. ३१ मे १८८७ ला महाराज इंग्लंडला गेले आणि २० फेब्रुवारी १८८८ ला ते भारतात परतले. हा प्रवास ८ महिने २० दिवसांचा होता. या प्रवासाला कुटुंबातील आणि संस्थानातील लोकांचा विरोध होता. कारण हिंदू धर्माप्रमाणे समुद्र प्रवास (परदेश प्रवास) हिंदू धार्मिक मान्यतेच्या विरुद्ध होता. महाराजांच्या सेवेतील अधिकारी, कर्मचारीही महाराजांबरोबर जाण्यासाठी टाळाटाळ

करत होते. महाराजांना युरोपचे आकर्षण होते. काही दिवस ऑक्सफर्डमध्ये विद्यार्थी म्हणून राहण्याची महाराजांची इच्छा होती.

युरोपातील शिक्षण व्यवस्थेचे महत्व महाराजांनी आपल्या पहिल्या परदेश प्रवासाअगोदरच ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी आपले लहान भाऊ संपतराव, पुतणे गणपतराव आणि जिवलग मित्र खासेराव जाधव यांना १८८४ मध्ये शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले होते. खानगी कारभारी जयसिंगराव आंग्रे स्वखर्चाने इंग्लंडला गेले होते. त्यांना युरोपचे वाटणारे आकर्षण त्यांनी जयसिंगराव आंग्रेंना २८ ऑगस्ट १८८६ ला युरोपला पाठविलेल्या पत्रात व्यक्त झाले आहे. या पत्रात महाराज लिहीतात, 'मला खरं म्हणजे आपला हेवा वाटतो. तुमच्या सारखंच युरोपात यावं असं मला वाटत पण ते काही वास्तवात होईल असे दिसत नाही.' पुढे निद्रानाशाच्या आजारावर उपचार म्हणून डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा आणि युरोपवारीचा सल्ला दिला. या प्रवासाची संपूर्ण जबाबदारी महाराजांचे गुरु एफ.ए.एच.इलियट यांच्यावर सोपविण्यात आली. महाराजांनी प्रवासातील मुख्याधिकारी म्हणून रामचंद्र धामणस्कर आणि सहाय्यक अधिकारी म्हणून व्ही.एम.समर्थ यांना बरोबर घेतले.

महाराजांच्या या पहिल्या परदेश प्रवासावर बडोद्यात उमटलेल्या प्रतिक्रिया फारच नकारात्मक होत्या. याचे प्रतिबिंब एका निनावी परिपत्रकात दिसते. यामध्ये ब्रिटीश महाराजांना

इंग्लंडमध्ये नेऊन अटक करतील, इलियट नावाच्या गुरूमुळे महाराजांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे, महाराज आता ख्रिस्तान होणार - हिंदूंच्या दृष्टीने धर्मांतर हे पाप या आशयाच्या चर्चा बडोद्यात सुरु झाल्या. या दौऱ्यात महाराजांनी एकूण १३ हुजूर हुकुम काढले. ते फारच महत्वाचे आहेत. विस्तारभयास्तव येथे आपण फक्त त्यांचा आशय चर्चेत घेऊ. यामध्ये गणदेवी येथे सुरु केलेला साखर कारखाना नफ्यात चालविण्यासाठी या कारखान्यात तयार होणारी साखर शुभ्र होण्यासाठी त्यामध्ये हाडाचा चुरा वापरण्याचा महाराजांना दिलेला सल्ला नाकारणारा आदेश, पॅलेस ग्रंथालयासाठी १५०० ग्रंथ खरेदी करणे, इंग्रजी पुस्तकांसाठी १ लाख रु. व संस्कृत पोथ्यांसाठी ३० हजार रु. देण्याचा आदेश, 'Cassel's Dictionary of Cookery' या पुस्तकाचे भाषांतर, संस्कृत व इंग्रजी भाषांचे ग्रंथ एत्तदेशीय भाषेत भाषांतर, बडोद्यात वस्तू संग्रहालय स्थापणे, वनविकास विद्येच्या अभ्यासासाठी इंग्लंडला दोन व्यक्ती पाठविणे, जनरेटर, लिफ्ट आणि शिपायांना बोलावण्यासाठी विद्युत बेल बसवणे या आदेशांचा अंतर्भाव होतो.

महाराजांचे वरील आदेश विचारत घेतले तर पहिल्या परदेशवारीत महाराजांनी बडोद्यातील 'नवनिर्माण' चळवळीची धमाक्यात सुरुवात केली होती असे म्हणता येईल. ज्ञान आणि विज्ञान याबाबत महाराज किती दक्ष होते याची प्रचिती वरील आदेशावरून मिळते. या जगप्रवासाने महाराजांच्या प्रकृतीमध्ये

चांगली सुधारणा झाली. वजन १० पौंडनी वाढले. महाराजांना उत्तम झोप मिळू लागली. या परदेश प्रवासानंतर महाराजांना प्रायश्चित्त घ्यावे लागले. त्यासाठीचा खर्च २७ हजार रु. आला. पुढे आदेश काढून महाराजांनी ही पद्धत बंद केली.

या परदेश दौऱ्याचे मुख्याधिकारी धामणस्कर यांनी बजावलेल्या उत्तम कामगिरीवर खुश होऊन महाराजांनी त्यांना १५० रु. मासिक पगारवाढ दिली. तर या प्रवासाचे हिशेबनीस सदाशिव महादेव यांना १०० रु. बक्षीस दिले. अविश्वसनीय वाटेल असा एक निर्णय महाराजांनी याच दौऱ्यात घेतला. तो म्हणजे त्यांच्या मातोश्री महाराणी जमनाबाई यांना द्यावयाच्या रकमेसंदर्भातील होता. जमनाबाईंना त्यांचे कर्ज फेडण्यासाठी मोठी रक्कम त्वरित हवी होती. महाराजांनी जमनाबाईंची सर्व खाते तपासून ५० हजार रु. निधी मंजूर केला. जमनाबाईंना महाराजांनी त्यांचे खाते तपासणे आवडले नाही. ज्या जमनाबाईंनी दत्तक म्हणून सयाजीरावांची निवड केली होती त्यांच्या आर्थिक शिस्तीबाबतचे महाराजांचे धोरण त्यांच्यातील कठोर प्रशासकाचे दर्शन  घडविते.

## दुसरा प्रवास : १८८८

पहिल्या जगप्रवासानंतर ६ महिने भारतात राहून महाराज पुन्हा दुसऱ्या जगप्रवासासाठी २६ जून १८८८ ला स्वित्झर्लंडला गेले. हा दौरा ३ महिने १२ दिवसांचा होता. यावेळीसुद्धा पहिल्या दौऱ्याप्रमाणे सर इलियट महाराजांसोबत होते. परंतु यावेळी

अधिकृतपणे इलियट यांना बरोबर नेण्यास भारत सरकारने परवानगी नाकारल्यामुळे महाराजांचे मित्र म्हणून ते सोबत गेले. या दौऱ्यात पहिल्या दौऱ्यातील आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थापनातील त्रुटी विचारात घेवून अनेक सुधारणा घडवून आणल्या. यामध्ये महाराजांच्या अनुपस्थितीत राज्यकारभार करण्यासाठी एक समिती स्थापन करून त्या समितीमार्फत कामकाजाचे नियोजन करण्यात आले. या दौऱ्यात महाराजांनी झेरमॅट या ठिकाणी शरीरस्वास्थ्यासाठी वास्तव्य केले. याचा त्यांच्या प्रकृतीवर चांगला परिणाम झाला. या दौऱ्यात बडोद्याच्या आठवणीने महाराज बऱ्याचदा व्याकूळ होत. या परदेश दौऱ्यात महाराजांनी राज्यकारभाराबाबत फारसे काही महत्वाचे काम केले नाही.

या दौऱ्यात महाराजांनी एकूण ११ हुजूर हुकूम काढले. यामध्ये महसूल विभागातील दोन हुशार व चतुर कारकुनांना लघुलेखन शिकण्यासाठी मुंबईला पाठवणे, मकरपुरा व लक्ष्मीविलास राजवाड्याच्या भोवतालच्या उद्यानांच्या देखभालीसाठी गोल्डरिंग या युरोपियन माळीची नियुक्ती, मकरपुरा राजवाड्यात जनरेटर बसवणे, झिंगारा बोटीची खरेदी, पेटलाद-आनंद रेल्वे कार्यान्वित करणे, लक्ष्मीविलास राजवाड्याच्या भोवतीच्या रस्त्यांचे नकाशे आणि जनतेच्या माहितीसाठी 'बडोदा वाटचाल' या पाक्षिकाच्या प्रकाशनाची योजना, गिरोनी नावाचा चित्रकार निसर्गचित्र काढण्यासाठी बडोद्याला पाठवणे,

अधिकारांचे विकेंद्रीकरण, सरकारला कायदेविषयक सल्ला देण्यासाठी कायदा समितीची निर्मिती, जनतेच्या माहितीसाठी शासन निर्णय प्रकाशित करणारे राजपत्र सुरु करणे या निर्णयांचा समावेश होता.

महाराजांचे वरील निर्णय विचारात घेता त्यांच्या लोककल्याणकारी राजाचे दर्शन घडते. प्रशासनातील अधिकारांचे विकेंद्रीकरण, सरकारला कायदेविषयक सल्ला देणारी समिती आणि शासन निर्णय लोकांना कळावेत म्हणून राजपत्राचे प्रकाशन हे महाराजांचे निर्णय या दृष्टीने विचारात घ्यावे लागतील. पहिल्या परदेश प्रवासादरम्यान महाराजांनी पॅरिसमध्ये एक घर विकत घेतले होते. त्याने महाराजांची त्यावेळी फसवणूक केली होती. त्या संदर्भात त्यांनी कोर्टात केस केली. कोर्टाच्या निकालानुसार त्या घराच्या जप्तीचा आदेश निघाला. परिणामी महाराजांनी पॅरिसमधील ब्रिटीश दूतावासाचा कायदेशीर सल्ला घेतला. या दुतावासाने 'फ्रेंच सरकारने आपल्या कायद्याच्या सीमा ओलांडून भारतातील एका राजाच्या विरोधात असलेला खटला कसा दाखल करून घेतला' या आशयाचा खटला न्यायालयात दाखल करावा. कारण महाराज हे आपल्या भूमीवरचे सार्वभौम राजे असून ज्यावेळी हे घर किरायाने घेण्यात आले त्यावेळी ते एक राजे म्हणूनच प्रवासात होते (साधे पर्यटक नाही) आणि त्यांच्यासोबत इंग्लंडच्या महाराणीचे प्रतिनिधी मि. इलियट हे पण आहेत.' असा सल्ला दिला.

पुढे या प्रकरणाचा निकाल महाराजांच्या बाजूने लागला. महाराजांनी आपल्या दुसऱ्या परदेश प्रवासात झिंगारा बोट खरेदीचा आदेश दिला. समुद्राचा प्रवास प्रकृतीस मानवतो हे सिद्ध झाल्याने महाराजांनी भारतात असतानाही समुद्री प्रवासाच्या हेतूने ही बोट खरेदी केली होती.

## तिसरा प्रवास : १८९२

इंग्लंड, नॉर्वे व जर्मनी या देशांना भेटी देणारा हा तिसरा प्रवास महाराजांनी ७ मे १८९२ ते ३ जानेवारी १८९३ दरम्यान केला. हा प्रवास ६ महिने २६ दिवसांचा होता. दुसऱ्या परदेश दौऱ्यानंतर महाराज ३ वर्षे १० महिने भारतात होते. या दरम्यान बडोद्याच्या विकासासाठी नव्या योजना आणि सुधारणा आणण्याचे महाराजांनी निश्चित केले. या दरम्यान डिसेंबर १८९१ मध्ये अतिसारामुळे महाराजांची तब्येत बिघडली. यावेळी मुंबईच्या तज्ञांनी समुद्र प्रवासाचा सल्ला दिला. परंतु आपल्या कामापासून दूर राहण्याची इच्छा नसल्यामुळे महाराज बडोद्याला परतले. बडोद्यातील कामासंदर्भात निर्णय घेवून महाराजांनी युरोपला जाण्याचा निर्णय घेतला. परंतु या प्रवासाला गव्हर्नर जनरलच्या एजंटने विरोध केला. प्रवासाचे सर्व तपशील त्याने मागून घेतले. तरीही परवानगीचा विषय लांबत राहिला. यामुळे महाराज संतप्त झाले. त्यांनी आपला हा संताप १५ एप्रिल १८९२ ला भारत

सरकारचे राजकीय अधिकारी कर्नल यांना पत्र लिहून व्यक्त केला. शेवटी त्यांनी ७ मे १८९२ रोजी विदेश सचिव मॉर्टीमर डूरँड यांना निर्वाणीचे पत्र लिहिले आणि ते युरोपला निघून गेले.

या तिसऱ्या प्रवासात महाराजांनी रियासतकार सरदेसाईंना मुलांना इंग्रजी शिकवण्यासाठी युरोपला बोलावले होते. परंतु सरदेसाईंना महाराजांनी एक अट घातली होती. ती अशी की त्यांच्या परदेश प्रवासानंतरच्या प्रायश्चित्ताचा खर्च त्यांनी स्वतः करावा. या प्रवासात पॅरीस येथे डॉ. चारकॉट यांना प्रकृती दाखवली. तेथून महाराज लंडनला गेले. तेथे प्रिन्स ऑफ वेल्स यांनी महाराजांचे स्वागत केले. लंडनमध्ये महाराजांनी हाऊस ऑफ पार्लमेंटलाही भेट दिली. तेथे अनेक महत्वाच्या लोकांशी महाराजांच्या भेटी झाल्या. या दरम्यान महाराजांनी समर्थ यांना झुरिच येथील तंत्रनिकेतन पाहण्यासाठी पाठवले आणि तेथील तंत्रविषयक कामाची संपूर्ण माहिती घेतली. या माहितीचा उपयोग महाराजांनी १८९० मध्ये स्थापन केलेल्या कलाभवनच्या प्रगतीसाठी करून घेतला असावा. याच प्रवासात इंग्लंडच्या महाराणींनी  महाराजांच्या पत्नी चिमणाबाई दुसऱ्या यांना 'इम्पेरिअल ऑर्डर ऑफ क्राऊन ऑफ इंडिया' हा सन्मान बहाल केला. याच प्रवासात किल्लेदार नावाच्या विद्यार्थ्याच्या शिक्षणाची तरतूद महाराजांनी केली. ऑक्टोबर १८९२ मध्ये डॉ. चारकॉट यांच्याकडून महाराजांची तब्येत तपासण्यात आली. महाराजांना तीन महिने अधिकचा काळ युरोपमध्ये थांबण्याचा

सल्ला डॉक्टरांनी दिला. या दौऱ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महाराजांनी सामाजिक वनीकरणाचा आदेश या दौऱ्यातून दिला. त्याचप्रमाणे महसूल व सर्वेक्षण विभागाचे प्रश्न मार्गी लावले. याच दौऱ्यातून महाराजांनी बडोद्यात कार्यरत असणाऱ्या फेलीसी या इटालियन शिल्पकाराला खालील शिल्पे करण्याचा आदेश दिला.

१. चित्यांचा एक कळप व त्यांना पाळणारी व्यक्ती यांचे शिल्प.

२. नृत्य मुद्रेमध्ये तंजावरच्या तरुण नर्तिका.

३. गायनाची महफिल, महिला गायिका व तबलची.

४. विविध जातींचे प्रतिनिधित्व करणारा माणसांचा समुदाय. उदा. १. गुजराती पुजारी, २. साधारण कामगार, ३. भिश्ती, ४. घोडेस्वार, शिपाई.

हे सर्व पुतळे, शिल्प बनवून घेण्याचा महाराजांचा उद्देश होता की इतक्या सगळ्या लोकांच्या राहणीमान व वेशभूषेबद्दल लोकांना माहिती मिळावी.

हा दौरा बडोदा राज्याच्या औद्योगिक विकासासाठी महत्वाचा ठरला. कारण या दौऱ्यात महाराजांना इंग्लंडमध्ये औद्योगिक विकासामुळे खेडी कशी समृद्ध झाली हे पाहायला मिळाले. यातून बडोद्यात सुरु असलेल्या उद्योगविषयक कामाला गती देणे शक्य झाले. याच दौऱ्यात बुटाच्या लेस तयार करणाऱ्या कारखान्याची योजना करण्याचे आदेश महाराजांनी दिले. भूगर्भशास्त्रीय सर्वेक्षण, मुक्या प्राण्यांबाबत होणाऱ्या

हिंसेविरोधातील कायदा, राज्याच्या वेगळ्या कार्यालयांच्या नामकरणाबाबतची समिती, डॉ. धुरंधर यांची स्वच्छता आयुक्त म्हणून नियुक्ती, युरोपच्या धर्तीवर उद्यानांची निर्मिती, अकार्यक्षम अधिकाऱ्यांना कमी करणे, कोणतेही काम करता जाती-धर्माचा विचार करू नये, मौलाबक्षच्या मुलास युरोपियन संगीत शिकण्यासाठी युरोपला पाठवावे, खाजगी धर्मादायासंदर्भात माहिती जमा करणे, शैक्षणिक तपासणी समिती इ. आदेश तिसऱ्या दौऱ्यातून महाराजांनी काढले. हे सर्व आदेश पाहिले असता आपल्या राज्याच्या सर्वांगीण उन्नतीचा संतुलित विचार हा राजा कसा करत होता हे ध्यानात येईल.

तिसऱ्या परदेश प्रवासानंतर महाराज ४ महिने संस्थानात होते. तिसऱ्या दौऱ्याहून आल्या आल्या लगेच त्यांनी आपल्या राज्याचा दौरा पूर्ण केला. या दौऱ्यानंतर परत आल्यानंतर लगेच महाराजांनी जानेवारी १८९३ मध्ये १४ महत्वाचे आदेश काढले. त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

१. आदेशाबाबतच्या सर्व प्रकारणांमध्ये मराठी अथवा गुजरातीचा वापर व्हावा. २. कृषीतज्ज्ञांसाठी ३ लाखांचे अग्रीम अनुदान मान्य केले. ३. हर्राशी समिती नेमून देण्यात आली व त्या समितीच्या अधिकारांची व्याख्या करण्यात आली. ४. महाराजांसमोर आणल्या जाणाऱ्या प्रकरणांबाबत नियामक संकेत तयार करण्यात आले. ५. खटला, लवादासाठी आलेल्या लोकांना थांबण्यासाठी वेगळा मंडप उभारण्यात यावा. ६.

लोकांनी नवीन छापखाने व वर्तमानपत्र सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. ७. पोलीस अधिकाऱ्यांनी न्यायालयात येताना आपला गणवेश परिधान करणे आवश्यक आहे. ८. ग्रॅन्ट मेडिकल कॉलेज, मुंबईला १००० रु. ची देणगी दिली. ९. हुजरे वर्गास प्रशिक्षण देण्यासाठी एक शाळा स्थापन केली. १०. शारीरिक शिक्षण व बलसंवर्धनासाठी शाळेत मल्लांकरिता पहेलवानांना नियुक्त करावे. ११. तंजावरहून नृत्यकलेचे शिक्षण देणारे कलाकार आणले व त्यांचे वर्ग सुरू केले. १२. भारतीय साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी समिती स्थापन. १३. पाटणच्या जैन ग्रंथांच्या जुन्या प्रतींचे पुनर्लेखन. १४. भिल्ल, कोळी इ. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळांची स्थापना करून त्यांना अन्न, शिक्षण, साहित्याचे अनुदान देण्याच्या आज्ञा दिल्या. महाराजांचे वरील आदेश आणि तिसऱ्या दौऱ्यातील महाराजांच्या चिंतनाचे प्रतिबिंब महाराजांच्या वरील धोरणाबाबत दिसल्यास आश्चर्य नाही.

## चौथा प्रवास : १८९३

महाराजांचा चौथा प्रवास कार्लसबाद येथे झाला. १ मे १८९३ ते २९ ऑक्टोबर १८९३ असा एकूण ५ महिने २८ दिवसांचा हा दौरा होता. मागच्या दौऱ्याप्रमाणे या दौऱ्यातही ब्रिटीश प्रशासनाशी महाराजांचा संघर्ष झाला. महाराजांसोबत परदेश दौऱ्यात ब्रिटीश राजकीय अधिकारी नेमाल्यावरून हा संघर्ष होता. याबाबत ११ ऑगस्ट १८९३ रोजी कर्नल रेई यांना

महाराजांनी लिहिलेले पत्र फारच बोलके आहे. या पत्रात महाराज लिहितात, 'ब्रिटनमध्ये नियुक्त केलेल्या राजकीय अधिकाऱ्यांनी प्रवासी भारतीय राजांना मदत करणे अपेक्षित आहे; पण अशा प्रवासी राजांना हे माहीत नसते की, त्या अधिकाऱ्याची मदत कोणत्या संदर्भात घ्यायची आहे. या अज्ञानापोटी हे राजे सगळ्याच गोष्टी विचारून करायला लागतात. मग काही गोष्टी या तो अधिकारी कसा आहे, त्याचे विचार व चारित्र्य कसे आहे यावर अवलंबून राहतात. काही अधिकारी राजांच्या खासगी बाबींमध्येही लक्ष घालतात जे अयोग्य आहे. काही अधिकारी राजांकडून प्रत्येक गोष्टीची, उपक्रमांची बारीकसारीक माहिती मागवतात, जे प्रत्येकवेळी शक्य नसते.' या पत्रात एक सार्वभौम राजा म्हणून ब्रिटीश साम्राज्यात सयाजीरावांचे असणारे स्वतंत्र अस्तित्व महाराज ब्रिटीश अधिकाऱ्यांना वारंवार लक्षात आणून देत होते. या दौऱ्यात महाराजांनी ट्रिस्ट, व्हिएन्ना, पॅरीस, सेंट मॉरीज, ल्युक्रेन, रोम्सडल व्हॅली, नॉर्थ केप, नॉर्वे इ. ठिकाणांना महाराजांनी भेटी दिल्या.

या दौऱ्यात महाराजांना कार्लसबड या ठिकाणी राहण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. कारण तेथील वसंत ऋतू महाराजांच्या आरोग्यासाठी हितकारक ठरणार होता. या दौऱ्यात युरोपमध्ये येणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी ऑस्ट्रियन लॉयड्स सारख्या कमी खर्चाच्या जहाजाने येणे जाणे करावे, युरोपियन ट्रीपच्या संदर्भात एक नियमावली तयार करावी असे आदेश काढले. या परदेश दौऱ्यात महाराजांनी प्रांची प्रभात विवाद, मुंबई येथील हिंदू

मुस्लीम दंगे, बडोदा टांकसाळ, रेल्वे विभाग, खिचडी योजनेतील दुरुस्त्या याबाबत आपली मते व आदेश दिले. या दौऱ्यातील एक क्रांतिकारक आदेश म्हणजे अमरेली जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सक्तीच्या शिक्षणाचा आदेश होय. याबरोबरच सयाजी सरोवरातील पाण्यावरचा जलशक्ती प्रकल्प, तीन रेल्वे मार्गांची बांधणी, राज्याच्या न्यानिक प्रशासनाचा इतिहास लिहिण्याचे आदेश, एस.एम.शितोळे यांना कृषी अध्यनासाठी इंग्लंडला पाठवले. इंग्लंडमध्ये कुकरी शिकणारे नामदेवराव कदम व व्यंकटराव धुलप यांना भारतात येऊन अभ्यास करण्याचे आदेश, नानासाहेब शिंदे यांना शिष्यवृत्ती वाढवून देण्याचा आदेश दिला. अशा प्रकारे अनेक मराठा विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्याच्या सुचना हे महत्वाचे आदेश महाराजांनी या परदेश प्रवासात दिले.

## पाचवा प्रवास : १८९३

या दौऱ्यात महाराजांनी इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली (जीनिव्हा, फ्लॉरेन्स), तुर्कस्तान (कान्स्टॉटिनोपल) या देशांचा प्रवास केला. हा दौरा १५ डिसेंबर १८९३ ते १८ जानेवारी १८९५ असा १३ महिने ३ दिवस कालावधीचा होता. चौथ्या युरोप प्रवासानंतर महाराज फक्त दीड महिना भारतात राहिले. महाराजांचे वारंवार परदेशी जाणे ब्रिटीश प्रशासनाला खटकत होते. त्यामुळे प्रत्येक परदेशवारी दरम्यान ब्रिटीश प्रशासन आणि महाराज यांच्यात यासंदर्भाने पत्रव्यवहार

झाल्याचे दिसते. या परदेश प्रवासात इंडिया ऑफिसने कॅप्टन इव्हान्स गॉर्डन यांची राजकीय प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली. ब्रिटीश प्रशासनाची ही कृती महाराजांना आवडली नाही. महाराज आरोग्यावर उपचार करून घेत असताना असा राजकीय अधिकारी आणि त्याचा खर्च अनावश्यक आहे ही महाराजांची भूमिका होती. या दौऱ्यात महाराजांची चिडचिड वाढली होती. महाराजांचा बहुतांश वेळ वाचनात जात असे. बडोद्याच्या काळजीने ते बेजार होत. याच दौऱ्यात महाराजांनी अरविंद घोष ज्यांना महाराज 'बाबू फ्रेंड' म्हणून बोलावत असत त्यांना महसूल विभागात मानाचे स्थान आणि अधिकारी पद देऊन त्यांच्या हाताखाली काम करण्यासाठी अधिकारी देण्याचे आदेश दिले. याच दौऱ्यात सोबत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या गरजेपेक्षा जास्त आहे त्यामुळे अनावश्यक खर्च वाढतो त्यामुळे ही कर्मचारी संख्या कमी करण्याचा निर्णय महाराज घेतात. याच दौऱ्यात महाराजांनी बडोद्यातून सक्तीचे शिक्षण, दोन तलावांची योजना आणि इतर काही महत्वाच्या प्रकरणांची माहिती मागविली. फेलिसी या शिल्पकाराचा बडोद्यातील कार्यकाल संपण्यापूर्वी त्यांच्याकडून पुढील लोकांचे अर्धपुतळे करून घेण्याची इच्छा महाराजांनी व्यक्त केली. १. राणीसाहेब जमनाबाई, २. राधाबाईसाहेब, ३. पार्वतीबाईसाहेब, ४. काझी शहाबुद्दीन, ५. रावबहादूर जगन्नाथ लक्ष्मण, ६. दिवाणसाहेब, ७. बाबूराव बाबा, ८. रेऊसाहेब व ९. मि. इलियट.

स्थानिक राज्यकारभाराबाबतच्या वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे महाराजांना सादर करणे तसेच इंग्लंडमधील सर्व नियतकालिकात भारताविषयी आलेले लेख जमा करून फाईल करणे असे आदेश दिले. याच कालावधीत सर इलियट यांच्याकडून बारखळी प्रशासनासंदर्भातील अहवाल तयार करून घेऊन छापून घेतला. या दौऱ्यातील सर्वात क्रांतिकारक निर्णय म्हणजे महाराजांनी बडोद्याच्या मिनिस्टरला पत्र लिहून 'त्यांनी भारत सोडण्यापूर्वी किमान १०० गावांमध्ये ग्रामपंचायतीची स्थापना करावी. निवडणुकीद्वारे ग्रामपंचायतींची स्थापना ही योजना मला संपूर्ण राज्यभर लवकरच लागू करायची आहे.' असा सर इलियट यांना निरोप दिला. याच पत्रात महाराज पुढे म्हणतात, 'ही योजना माझ्या राज्यामध्ये सुधारणा करण्याच्या मार्गावरील मैलाचा दगड ठरेल.'

या दौऱ्यातील सक्तीच्या शिक्षणासंदर्भातील पुढील आदेश महाराजांचा सक्तीच्या शिक्षणाबाबतची महाराजांची तळमळ व्यक्त करतो. 'अमरोली प्रांतात जे सक्तीचे शिक्षण सुरू करण्यात आले, त्याचे समाधानकारक परिणाम पाहून महाराजांना आनंद झाला. आता महाराजांची अशी इच्छा आहे की, सक्तीच्या शिक्षणाचे कार्य हे संपूर्ण प्रांतामध्ये सुरू करण्यात यावे. याचे पूर्ण अधिकार हे अँग्लो इंडियन व्हनाक्युलर एज्युकेशन यांना देण्यात यावेत, त्याचा त्यांनी तारतम्याने वापर करावा. या कामामध्ये अडचणी येणार आहेत हे नक्की; पण कोणत्याही समस्यांना

तोंड देत हे काम न थांबवता सुरू ठेवले पाहिजे. व्हनाक्युलरच्या संचालकांना यासाठी १०० रु. दरमहा देण्याच्या आज्ञा महाराजांनी दिल्या आहेत. ही रक्कम पेंशनच्या रकमेव्यतिरिक्त असेल.'

वरील आदेशाप्रमाणेच शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना परदेशात पाठविण्यासंदर्भातील योजना तयार करण्याचा महत्वपूर्ण आदेश महाराजांनी दिला. यावरून प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण याबाबतचे महाराजांचे धोरण १८९४ मध्येच निश्चित झाले असल्याचे दिसते. भारतातील परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती योजनेचा हा आरंभ होता. तो आदेश पुढीलप्रमाणे - 'राज्याच्या वित्त विभागाची परवानगी असेल, तर प्रवासी शिष्यवृत्तीची एक योजना सुरू करावी. ज्याद्वारे बडोदा संस्थानच्या नागरिक असलेल्या तरुण विद्यार्थ्यांना युरोपमध्ये अभ्यासासाठी प्रवास सवलत द्यावी. बडोदा कॉलेजचे हे विद्यार्थी आपणास त्यासाठी शपथपत्र देतील की, त्यांचा अभ्यास पूर्ण झाल्यावर ते संस्थानमध्येच नोकरी करतील. या योजनेचा तपशील तयार करावा, खर्चाचा विचार करावा व विद्यार्थी स्वीत्झर्लंडमध्ये शिक्षण घेतील असे पाहावे.'

प्राथमिक शिक्षण, परदेश शिक्षण याबरोबरच लहान मुलांच्या मनोरंजनासाठीची पुस्तके हा विषयसुद्धा महाराजांच्या नजरेतून सुटला नव्हता. लहान मुलांच्या शारीरिक विकासाचा विचार करून महाराजांनी याविषयीचा पुढील आदेश काढला. 'मुलांसाठी खेळांची माहिती एका पुस्तकात संकलित करावी.'

बारखळी विभागातील प्रश्न हा एक महाराजांच्या चिंतेचा विषय होता. सर इलियट यांचा या क्षेत्रातील अनुभव विचारात घेऊन या विभागाची जबाबदारी इलियट यांनी स्वीकारायची आज्ञा महाराजांनी दिली. याच दौऱ्यात जिनेव्हा येथून आणखी एक महत्वपूर्ण आदेश दिला होता तो म्हणजे युरोप प्रवासादरम्यानचा महाराजांचा सर्व पत्रव्यवहार हा मराठीत भाषांतरित करून खंड रूपाने प्रकाशित करावा.

१. फायफी लिखित 'आधुनिक युरोपचा इतिहास' या पुस्तकाचे शिक्षण विभागाच्या वतीने गुजरातीमध्ये भाषांतर करावे. सोप्या भाषेत केलेल्या या भाषांतरामध्ये प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी प्रश्न द्यावेत.

२. मि. खराड़ी हे लंडनमध्ये लोखंडी अलमारी बनवण्याचे प्रशिक्षण घेत आहेत. त्यांच्या जोडीला अजून एक तरुण पाठवावा. ज्याला इंग्रजी चांगले समजत असेल असा म्हणजे मग त्याचा प्रशिक्षणाचा कालावधी मर्यादित होऊन काम लवकर होईल.

३. सहावी व्हर्नाक्युलर परीक्षा पास झाल्याशिवाय बोर्ड परीक्षेचे प्रमाणपत्र देऊ नये, असे महाराजांना वाटते.

४. मी 'अन्न' या विषयावरचे एक पुस्तक पाठवत असून, व्हर्नाक्युलर संस्थेच्या संचालकांनी सोप्या गुजरातीमध्ये ते भाषांतरित करावे आणि गृहशास्त्र पाठशालेस द्यावे. याच पुस्तकात भारतीय अन्नाबाबत माहिती द्यावी. हे आदेशसुद्धा या दौऱ्यातील आहेत.

## सहावा प्रवास : १९००

पाचव्या प्रवासानंतर महाराजा ५ वर्षे ४ महिने बडोद्यात राहिले. पाचव्या प्रवासावरून बडोद्यात आल्यावर महाराजांच्या असे लक्षात आले की राज्याच्या कायद्याची स्थिती फारच विस्कटलेली आहे. याला जे अधिकारी जबाबदार होते त्यांना बदलून महाराजांनी नवीन अधिकारी नेमले. सरकारी यंत्रणा मुळापासून बदलून टाकण्याचा महाराजांनी झपाटा लावला. परिणामी दोनच वर्षात राज्याचा दबदबा आणि बडोद्याची प्रतिष्ठा पुन्हा उंचावली.

सहाव्या परदेश प्रवासाचे कारण यावेळी महाराजांची तब्येत हे नव्हते तर महाराणींची बिघडलेली तब्येत हे होते. बडोद्यातील दुष्काळ आणि प्लेगची साथ यांच्या पार्श्वभूमीवर हा सहावा प्रवास महाराजांनी केला. आजपर्यंतच्या परदेश प्रवासांचा विचार करता एवढ्या अनिच्छेने महाराजांनी केलेला हा पहिला प्रवास होता. फ्रान्स देशाचा हा परदेश प्रवास १९ मे १९०० ते ११ जानेवारी १९०१ पर्यंत एकूण ७ महिने २३ दिवसांचा होता.

या दौऱ्याबाबतच्या महाराजांच्या भावना व्यक्त करणारे दोन संदर्भ फार महत्वाचे आहेत. कारण त्यातून महाराजांच्या त्यावेळच्या मनोस्थितीचे दर्शन घडते. यातील पहिला संदर्भ म्हणजे कर्नल रॅवन्झॉ यांना १८ मे १९०० रोजी लिहिलेले पत्र. या पत्रात महाराज म्हणतात, ‘बडोदा सोडताना आजच्या इतका असंतुष्ट मी कधीच नव्हतो. दुष्काळपीडित गरीब जनतेची तुम्ही

योग्य ती काळजी घ्यालच.' दुसरा संदर्भ म्हणजे महाराजांच्या दैनंदिनीतील उतारा. मे १९०० च्या दैनंदिनीत महाराज लिहितात, 'इतक्या अनिच्छेने यापूर्वी कधीच प्रवासाला निघालो नव्हतो; कारण या वेळेस दुष्काळाने होरपळणाऱ्या माझ्या राज्यातील रयतेकडे मी स्वतः व्यक्तिगत लक्ष द्यायचे सोडून त्यांच्यापासून दूर चाललो होतो. तरीपण मनात थोडे फार समाधान होते की, त्यांच्यासाठी जे काही करायचे त्याची व्यवस्था लावूनच मी जात होतो. पावसाळा सुरू होईल तोपर्यंतच्या काळातील त्यांच्या पोटापाण्याची आणि रोजगाराची तरतूद करून मगच मी प्रवासाला निघालो होतो.'

या दौऱ्यात महाराजांची मुले आणि भाऊ संपतराव सोबत होते. लंडनमध्ये पोहोचताच महाराणींच्या उपचाराची तातडीने व्यवस्था केली आणि त्यानंतर राजपुत्रांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. महाराजांना आपल्या सर्व मुलांना इंग्रजी शिक्षण द्यायचे होते. या दौऱ्यात १८ जून १९०० ला महाराजांनी संपतराव गायकवाडांबरोबर प्रिंन्स ऑफ वेल्स यांची भेट घेतली. याबरोबरच ड्युक ऑफ कनॉट आणि लंडनमधील इंडिया ऑफीसचे लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांचीसुद्धा भेट घेतली. इंग्लंडच्या महाराणीने बकिंगहॅम पॅलेसमध्ये एका संगीत सभेसाठी महाराजांना आमंत्रित केले. याच दौऱ्यात जामनगरचे राजकुमार, प्रसिद्ध क्रिकेटपटू रणजितसिंह महाराजांना भेटले. महाराजांनी त्यांना ७ हजार रु. दिले. या दौऱ्यादरम्यान महाराजांच्या

अनुपस्थितीत लॉर्ड कर्झनने १ ऑगस्ट १९०० मध्ये बडोद्याला भेट दिली. शेती लागवडीसाठी शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी महाराजांनी १० लाख रु. मंजूर केले. त्याचप्रमाणे भारतात लघु उद्योग सुरु करण्यासाठी लागणारी आवश्यक माहिती जमा केली. छगनलाल मोदींना होमरच्या ओडिसी या महाकाव्याचे सोप्या गुजरातीत भाषांतर करण्याचे तसेच देशी शिक्षण विभागातून इंग्रजीशिक्षण विभाग वेगळा काढण्याचे आदेशदेखील दिले.

महाराजांनी ५ सप्टेंबर १९०० ला काढलेले आदेश पुढीलप्रमाणे - १. निवडक पिलवाई कागदपत्रे छापून घ्यावीत. २. संस्थानच्या राज्यकारभाराचा ताजा अहवाल छापून घ्यावा. ३. दुष्काळी कामाच्या अहवालाचीपण छपाई करावी. ४. महाराजांनी पदग्रहण केल्यापासूनचा बडोद्याच्या कामकाजाचा इतिहास इंग्रजीत छापून घ्यावा. यात त्यांनी वेळोवेळी सर्व विभागात केलेल्या सुधारणांचा समावेश असावा. ५. संस्थानातील सिंचन प्रकल्पांचा संभाव्य आराखडा तयार ठेवावा. ६. प्रत्येक प्रकल्पाच्या विकासाचा छापील वृत्तांत महाराजांना सादर करावा. ७. मालमत्तेच्या हस्तांतरणाचे बिल मंजूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. ८. कलाभवन युरोपीयन कलावंतांच्या निगराणीत आणि निमंत्रणात द्यावे किंवा कसे याबाबतीत विचार व्हावा.

महाराजांनी पाठविलेल्या सार्वजनिक आरोग्याविषयी स्मरणपत्रात पुढील बाबींचा समावेश होता. मंत्र्यांनी सॅनिटरी कमिश्नर किंवा आरोग्य शहर सॅनिटरी इन्स्पेक्टर यांना

पंधरवड्यातून एकदा जनतेसाठी सोप्या पद्धतीने १. घरगुती स्वच्छता, २. आणि अपघाताच्या वेळी काय करायचे याविषयी भाषण द्यावे. ही व्याख्याने स्थानिक भाषेत द्यावी आणि सहा महिन्यांनंतर ती पुस्तकाच्या स्वरूपात छापून घ्यावीत. स्थळ आणि वेळेची सूचना लोकांना द्यावी म्हणजे ते या भाषणाचा लाभ घेऊ शकतील. स्थळाच्या बाबतीत म्युझियम जवळच्या पार्कची मी शिफारस करीन. त्यानंतर या विषयीची परीक्षाही घेता येईल. प्रमुख आरोग्य अधिकाऱ्यांनी या आदेशाचे नीट पालन होते आहे किंवा कसे याकडे लक्ष द्यावे. इकडे लंडन आणि इंग्लंडच्या इतर शहरांतून ही पद्धत अवलंबिली जाते आणि आपणही तिचे अनुकरण करावे असे वाटते. शक्य असेल तर त्यात सुधारणाही करावी.' महाराजांचे हे स्मरणपत्र म्हणजे कुटुंबप्रमुखाने ज्याप्रमाणे कुटुंब सदस्यांचा विचार करावा असाच काहीसा प्रकार आहे.

## सातवा प्रवास : १९०५

प्रकृती व मानसिक आनंदासाठी ८ महिन्यांचा सहावा युरोप प्रवास करून ११ जानेवारी १९०१ रोजी आल्यानंतर महाराज ४ वर्षे १ महिने २० दिवस बडोद्यात होते. त्यानंतर सातव्या परदेश वारीसाठी ०१ एप्रिल १९०५ ते १६ नोव्हेंबर १९०६ अशा २० महिना १५ दिवसांच्या इंग्लंड दौऱ्यावर गेले. सहाव्या परदेश दौऱ्याने महाराजांच्या आरोग्यावर योग्य तो परिणाम घडवून आणला. फेब्रुवारी १९०१ मध्ये महाराजांनी त्यांच्या संस्थानातील

सिनोर, करजन आणि पदरा या तालुक्यांचा दौरा फेब्रुवारीमध्ये केला. ५ फेब्रुवारी १९०१ ला राज्यातील शिक्षण व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी मि. कॉटन यांची नियुक्ती केली. ५ मार्च १९०१ ला महाराजांनी संपत्तीचे पंजीकरण, विधवा पुनर्विवाह, बालविवाहविरोधी कायदा इ. संबंधी कायदे करण्याचे आदेश महाराजांनी मंत्र्यांना दिले होते. ही बडोद्यातील हिंदू कोड बिलाची पायाभरणी होती. ब्रिटीश भारतात हिंदू कोड बिलाची चर्चा आणि प्रयत्न यानंतर १८ वर्षांनी १९१९ मध्ये सुरु झाले. यातून सयाजीरावांच्या प्रागतिक विचाराचा दर्जा आपल्या लक्षात येईल. महाराज सहाव्या प्रवासात युरोपमध्ये असताना कर्झन सर्क्युलर हे प्रकरण भारतात घडले. हे कर्झन सर्क्युलर भारतीय राजांना परदेशात जाण्यासाठी प्रतिबंध घालणारे होते. याबद्दल महाराजांनी लेखी आक्षेप घेत आपली भूमिका परखडपणे मांडली.

१९०२ मध्ये महाराजांना ताप आणि कफ यांचा त्रास सुरु झाला. वैद्यकीय सल्ल्यानुसार काही महिने समुद्र प्रवासासाठी जाण्याचे महाराजांनी ठरवले. बडोद्याच्या रेसिडेंटला याबाबत सूचना दिली. परंतु कर्झन सर्क्युलरनुसार दौऱ्याला मान्यता घेणे, योग्य कारणे देणे बंधनकारक झाले. हा संघर्ष १९०५ पर्यंत चालला. दरम्यान २७ सप्टेंबर १९०४ रोजी रेसिडेंटला पत्र लिहून महाराजांनी परदेश दौऱ्यावर जाण्याची गरज स्पष्ट केली. रेसिडेंटला महाराजांचा ठाम निर्णय लक्षात आला. तो काहीना

काही कारण दाखवून दौरा टाळण्याचा प्रयत्न करत होता. परंतु शेवटी १ मार्च १९०५ ला महाराज आपल्या युरोप दौऱ्यावर रवाना झाले. या दौऱ्यात महाराजांनी लंडनच्या सोसायटी ऑफ आर्ट्स (भारतीय विभाग) च्या सभेचे अध्यक्षपद भूषविले.

पुढे बर्लिन येथे जर्मनी व अमेरिका यांच्या द्विपक्षीय बौद्धिक आदान-प्रदान विषयक व्याख्यानमालेचे अध्यक्षही महाराज होते. तेथून महाराज ऑस्ट्रिया दौऱ्यावर गेले. तेथे व्हेनिस येथील उद्योगांचा महाराजांनी अभ्यास केला. त्यातील काही उद्योग बडोद्याला नेता येतील का हा हेतू यामागे होता. तेथून ग्रीस, इटली, स्वित्झर्लंड, पॅरीस, स्पेन मार्गे महाराज न्यूयॉर्कला गेले. येथे त्यांनी नॅचरल हिस्ट्री म्युझियम पाहिले. तेथून वॉशिंग्टनला जाऊन २६ मे १९०६ रोजी राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. तेथील दोन शैक्षणिक संस्था, एक महिला महाविद्यालय आणि कायदेविषयक केंद्र यांना महाराजांनी भेटी दिल्या. तेथून ते फिलाडेल्फियाला गेले. तेथे त्यांनी उद्योगधंद्यांची पाहणी केली. तेथून हावर्ड व शिकागोला भेट देण्यासाठी पुढे निघाले. येथील विविध शैक्षणिक संस्थांना त्यांनी भेटी दिल्या. तेथुन ते कोलोरॅडोला गेले. तेथे त्यांनी खान व्यवसायाची पाहणी केली तसेच तेथील रेडइंडियन लोकांमध्ये आपला वेळ आनंदात घालवला. तेथून सॅन फ्रान्सिस्को येथील ओरेगॉनच्या औद्योगिक क्षेत्राला भेट दिली. ३ महिने अमेरिकेचा प्रवास करून महाराज युरोपला आले. तेथून १६ नोव्हेंबर १९०६ ला भारतात पोहचले.

भारतात आल्यानंतर महाराजांनी कायदे कौन्सिलला नागरी व गुन्हेगारी संदर्भातील राज्याच्या कायदेशीर प्रभावक्षेत्राचा युरोप आणि अमेरिकेतील कायदा क्षेत्राशी तुलनात्मक अभ्यास करण्याचा आदेश दिला. याला कर्झन सर्क्युलरचा संदर्भ होता.

या दौऱ्यात २७ मार्च १९०५ ला ५० विद्यार्थ्यांना संगीत क्षेत्रातील उच्च शिक्षण देता येईल असे विद्यालय सुरु करण्याच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे अनाथआश्रमात तंत्रशिक्षण-प्रशिक्षण देण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. या दौऱ्यातील क्रांतिकारक निर्णय म्हणजे २१ जून १९०६ ला कोलोरॅडो येथून छोटी शहरे आणि खेड्यांमध्ये ग्रंथालये स्थापन करण्याचा आदेश दिला. बडोद्यातील आणि भारतातील ग्रंथालय चळवळीचा हा आरंभ होता. याच दौऱ्यात गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या राज्याच्या धोरणातील त्रुटी दूर करण्यासाठी नवे नियम बनविण्याचे आदेश दिले. याबरोबरच बडोद्यातील हुशार विद्यार्थी अभ्यासासाठी युरोपला पाठविणे, जर्मन व फ्रेंच साहित्याचा अभ्यास करण्यासाठी दोन हुशार विद्यार्थी युरोपला पाठविणे, ग्रंथालयाचा अभ्यास, बागकाम याविषयासाठी तसेच अमेरिकेतील कृषीविज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी विज्ञान विषयाचे दोन विद्यार्थी, अध्यापनशास्त्र, समाजशास्त्र, कला आणि हस्त व्यवसाय, लोहार आणि सुतारकाम, चित्रांची निगराणी करण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी पाठविण्याचे निर्णय या

दौऱ्यात झाले. एकाच वेळी एवढ्या विषयांच्या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी पाठविण्याचा निर्णय घेणारे सयाजीराव आजअखेरचे एकमेव प्रशासक आहेत.

गेसॉटचे 'हिस्ट्री ऑफ सिव्हिलायझेशन' आणि फिपूचे 'मॉडर्न हिस्ट्री ऑफ युरोप' या दोन पुस्तकांचा अनुवाद, नागरिकांचे हक्क काय, त्यांची कर्तव्ये काय आणि त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी याचे विवरण या विषयावर टिपण तयार करून त्याचा सोप्या भाषेत अनुवाद करून १५ ते १८ वर्षे वयाच्या मुलांना सहज लक्षात येतील अशा पद्धतीने त्याची रचना असावी अशी सूचना केली. या टिपणाबरोबरच भारतातील लोकांच्या फायद्यांसाठी ज्या औद्योगिक योजनांचा समावेश करता येऊ शकेल यावर विशेष भर दिलेला, ज्यामध्ये खालील प्रकरणांचा समावेश असावा असा ग्रंथ तयार करण्याची सुचना दिली. १. युनायटेड स्टेटच्या औद्योगिक विकासासाठी सरकारी पातळीवर किंवा अन्य मार्गांनी कसे प्रोत्साहन देण्यात आले, त्याचे स्वरूप आयात-निर्यातीसंबंधित आकडेवारी पण विचारात घ्यावी. २. अमेरिकेतील शिक्षण पद्धती ३. अमेरिकेतील कृषी क्षेत्र आणि त्याच्याशी निगडित औद्योगिक व्यवसाय ४. वाढत्या मुलांचे आणि त्यांच्या पालकांचे हितसंबंध ५. कामगार संघटना, त्यांची रचना कशी असते आणि त्यांचे नियंत्रण करण्याची पद्धती ही

सर्व टिपणे अशा सामान्य जनतेसाठी असावीत, जी फारशी शिकलेली नाही. औद्योगिक विकास या प्रकरणात अमेरिकेची युरोपच्या अन्य देशांतील विकासकार्यांबरोबर केलेल्या तुलनेचा समावेश असावा.

या सूचनेत शेवटी औद्योगिक विकास प्रकरणात अमेरिकेची युरोपच्या अन्य देशातील विकासाशी तुलना असावी अशी महत्वाची सूचना महाराजांनी केली होती. याच दौऱ्यात बडोदा कॉलेजच्या वसतिगृहासाठी ५० हजार रु. खर्च करणे, विश्वामित्रीवर दोन पूल बांधणे त्याचप्रमाणे राज्यातील वेगवेगळे रेल्वे लाईन्स बांधण्याच्या योजना आखल्या. बम्पस या अमेरिकन तज्ञावर बडोद्यासाठी उद्योगधंद्यातील तज्ञ आणण्यचि जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आले.

## आठवा प्रवास : १९१०

सातव्या जगप्रवासानंतर ३ वर्षे ४ महिन्यांनी महाराजांनी त्यांचा आठवा जगप्रवास केला. हा जगप्रवास इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, अमेरिका या देशांचा होता. ३० मार्च १९१० ते १६ डिसेंबर १९१२ या दरम्यान २ वर्षे ४ महिने १७ दिवस महाराज परदेशात होते. या प्रवासात महाराज प्रथम कोलंबोला गेले. तेथून पेनांगल, सिंगापूर, हॉंगकॉंग, मकाऊ, शांघाय, नागासाकी, याकोहामा, किओतो, टोकियो असा प्रवास केला. याकोहामा येथे इनोसिमा येथील बौद्ध मंदिराला व गुफांना महाराजांनी भेट

दिली. त्यानंतर किओतो येथील विद्यापीठाला आणि मुख्यत: बुद्धाची शिकवण देणाऱ्या बौद्ध शाळेलाही महाराजांनी भेट दिली. २३ मे १९१० ला जपानच्या राजा राणीला भेट देऊन सॅन्फाफ्रान्सिस्को मार्गे न्यूयॉर्कला गेले तेथे हार्वर्ड विद्यापीठातील डॉ. लानमर्मन आणि बुमसप यांच्याबरोबर महाराजांच्या बैठकी झाल्या. याच दरम्यान अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांची भेट घेतली. तेथून ते इंग्लंडला गेले. इंग्लंड मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या ग्रंथालयाला भेट, तेथून बोर्न एंड येथील ब्रिटीश एम्पायर क्लबला महाराजांनी भेट दिली. या क्लबचे सदस्यत्व महाराजांना दिले गेले. या दौऱ्यात रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीने महाराजांना सन्माननीय सभासदत्व बहाल केले. तसेच नैतिक शिक्षण समुदायाचे उपाध्यक्ष म्हणून सयाजीरावांची निवड झाली. तेथून ते भारतात परतले.

## नववा प्रवास : १९११

चीन, जपान, सॅन्फ्रान्सिस्को, कॅनडा, लंडन असा हा दौरा २२ एप्रिल १९११ ते १० नोव्हेंबर १९११ असा ५ महिने १९ दिवसांचा होता. या दौऱ्यात इंग्लंडच्या सम्राटाच्या राज्याभिषेक सोहळ्यास महाराज हजर राहिले. महत्वाचे म्हणजे २८ जुलैला लंडन विद्यापीठात भरलेल्या पहिल्या जागतिक मानववंश परिषदेच्या एका सत्राचे अध्यक्षपद महाराजांनी भूषविले व भाषण केले. १४ सप्टेंबर रोजी स्कॉटलंड येथील सेंट अंड्र्यू विद्यापीठाच्या ५०० व्या वर्धापनदिनाचे पाहुणे म्हणून सयाजीराव हजर राहिले

व भाषण केले. २२ सप्टेंबरला उत्तर स्कॉटलंडमधील इनव्हरनेस येथील वार्षिक क्रीडा महोत्सवास सयाजीरावांनी भेट दिली.

## दहावा प्रवास : १९१३

हा इंग्लंड दौरा ३ मे १९१३ ते ७ नोव्हेंबर १९१३ असा ६ महिने ४ दिवसांचा होता. फेब्रुवारी १९१३ मध्ये महाराजांची प्रकृती बिघडल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना परदेश प्रवासाचा सल्ला दिला. या प्रवासात पॅरिसजवळील  एव्हीअन या ठिकाणी महाराजांनी मुक्काम केला. येथे महाराजांनी थोडेफार फ्रेंच शिकून घेतले. निसर्ग संपत्तीने परिपूर्ण अशा या ठिकाणी महाराजांच्या प्रकृतीला चांगला आराम मिळाला. त्यानंतर महाराज जिनिव्हाला गेले. जिनिव्हा विद्यापीठात महाराजांनी वनस्पतीशास्त्राचे प्रा. रॉबर्ट यांच्याशी महाराजांनी चर्चा केली. त्यांच्याकडून महाराजांना वनस्पतीशास्त्र शिकायचे होते. परंतु महाराजांना ते शक्य झाले नाही. येथेच महाराजांनी हॉटेल व्यवस्थापनाचा अभ्यास केला.

या दौऱ्यात महाराजांची परवानगी घेऊन राजकुमारी इंदिरा राजे लंडनला गेल्या आणि राजपुत्र जितेंद्र नारायण बहादूर कुचबिहार यांच्याशी सोमवार, २४ ऑगस्टला ब्रह्मो समाजाच्या रितीने विवाहबद्ध झाल्या. कु. टोटेनहॅम आणि कॅप्टन परब हे राजकुमारीबरोबर होते. त्यांनी विवाहाच्या सर्व बाबी कायदेशीररीत्या पूर्ण झालेल्या पाहावयाच्या होत्या. त्याप्रमाणे सर्व गोष्टी योग्यरित्या पार पडल्या होत्या. इंदिराराजे यांच्या ताब्यात असलेल्या दागिन्यांची यादी तेथील खजिनदारांकडे सोपवण्यात आली होती.

## अकरावा प्रवास : १९१४

महाराजांनी १८ मे १९१४ ते ४ डिसेंबर १९१४ असा ६ महिने १४ दिवसांचा हा स्वित्झर्लंडचा (सेंट मॉरीट्झ) प्रवास प्रकृती स्वास्थ्यासाठी डॉक्टरांच्या सांगण्यावरून केला होता. या प्रवासात महाराजांनी ब्रिटिश प्रतिनिधी गॅलंड व कॅप्टन शिवराज सिंह यांच्यासह लौसन्ने येथील उत्तम दवाखाने आणि शाळांना भेटी दिल्या. अद्ययावत सुविधा असलेल्या या संस्थांना भेटी देताना आपल्या संस्थानात अशा सुविधा कशाप्रकारे सुरू करता येतील आणि आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना या शाळांमध्ये कसे पाठवता येईल याचा विचार करत असत. महाराजांनी येथील शाळेमध्ये कु. पांढरे आणि कु. पुणेकर यांचा प्रवेश निश्चित केला परंतु युरोपातील युद्धजन्य परिस्थितीमुळे ते प्रत्यक्षात येऊ शकले नाहीत.

बेऊमॉंटचे सरदार महाराजांना फ्रान्स रेडिओ इलेक्ट्रिक संस्थेस भेटीसाठी घेऊन गेले. तेथे बिनतारी संदेशवहन यंत्रे बनवली जात होती. महाराजांनी त्याची कार्यप्रणाली, स्थापना आणि ही यंत्रणा समुद्र व जमिनीवर कशा पद्धतीने कार्य करते हे समजून घेतले. ज्यावेळी जर्मनी व इंग्लंडमधील युद्धाची घोषणा झाली त्यावेळी बडोद्यातून महाराजांना बडोदा संस्थानचे सर्व प्रकारचे सहाय्य ब्रिटनच्या सम्राटांना दिले जाईल, असे इंडिया ऑफिसला कळवण्याचे सुचवण्यात आले. त्याप्रमाणे महाराजांनी लॉर्ड क्रेवे यांना तार करून याबद्दल कळविले. महाराजांची विची येथे

कोलंबियाचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल रेइस यांच्याशी ओळख झाली. मुंबईचे राज्यपाल म्हणून काम केलेल्या लॉर्ड रिये यांची स्कॉटलॅंड येथे भेट घेतली.

महाराजांनी ईस्टबोर्न येथील कु. एफ. एम. वेस्ट यांच्या शाळेला भेट दिली. या शाळेत श्री. रूजे यांच्याकडे किसनराव गायकवाड यांचे चिरंजीव गणपतराव गायकवाड यांना शिक्षणासाठी ठेवले होते. महाराजांनी केंबरले येथील दोन युद्धकैद्यांच्या छावण्यांना भेट दिली. त्यावेळी सयाजीरावांनी छावणी कमांडरकडे काही रक्कम देऊन ज्या कैद्यांना पैशांची अधिक गरज आहे त्यांच्यासाठी वापरण्याची अपेक्षा व्यक्त केली. २१ ऑक्टोबर १९१४ ला महाराजांनी बकिंगहॅम राजवाड्यात ब्रिटनच्या सम्राटांची भेट घेतली. रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ ग्रेट ब्रिटन या संस्थेला सयाजीरावांनी भेट दिली. त्यावेळी महाराजांना या संस्थेचे आजीवन सदस्यत्व प्रदान करण्यात आले. या दौऱ्यावेळी महाराजांनी बडोद्यातील पांढरे, पुणेकर, गणपतराव व अवचितराव यांचे चिरंजीव अशा चार विद्यार्थ्यांना लंडनला शिकण्यासाठी पाठविण्याचा निर्णय घेतला.

## बारावा प्रवास : १९१९

अकराव्या जगप्रवासानंतर महाराज ५ वर्षे ३ महिने भारतात होते. जून-जुलै १९१९ दरम्यान महाराज काश्मीरमध्ये होते. यावेळी महाराजांना संधीवाताचा खूप त्रास झाला. यावर उपचार करण्यासाठी महाराजांना युरोपला जाण्याचे डॉक्टरांनी

सुचविले. त्यानुसार २३ सप्टेंबर १९१९ ला महाराज युरोपला जायला निघाले. त्यापूर्वी राजपुत्र जयसिंहराव गंभीर आजारी असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार १५ सप्टेंबरला त्यांना उपचारासाठी इंग्लंडला पाठविण्यात आले. महाराजांच्या लंडनमधील वास्तव्यात दोन दु:खद घटना घडल्या. त्या म्हणजे राजकुमारी पद्मावती आणि युवराज शिवाजीराव यांचे निधन झाले. या घटनांमुळे महाराज मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पुर्णपणे खचले असल्याने काही दिवस त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

राजकुमारी लक्ष्मीदेवी राजे यांच्या शिक्षणाची व्यवस्था स्टॅनमोर भागातील 'बेंटली प्रायओरी' या शैक्षणिक संस्थेत करण्यात आली. इंग्लंडच्या वरिष्ठ सभागृहात अमृतसर प्रकरणावर होणारी चर्चा ऐकण्यासाठी महाराज गेले होते. राजपुत्र प्रतापसिंह यांच्या शिक्षणासाठी महाराजांनी लंडनमधील अनेक शाळांची माहिती घेतली होती. शेवटी श्री. रूज यांच्या सल्ल्याने ईस्टबर्गमधील टेम्पल ग्रोव्ह शाळेची निवड केली. राजपुत्र जयसिंहराव यांना उपचारासाठी जर्मनीला पाठविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. २३ सप्टेंबर १९१९ ते ५ फेब्रुवारी १९२० अशी ५ महिने १३ दिवसांची इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशांमधील महाराजांची ही परदेश वारी होती.

## तेरावा प्रवास : १९२१

महाराज २४ मार्च १९२१ ला इंग्लंडला जाण्यासाठी बडोद्यातून निघाले. लौसन्ने येथील पॅलेस हॉटेलमध्ये ३३ दिवस महाराजांनी मुक्काम केला. पुढे विची येथे असणारे हॉटेल डू पार्कमध्ये महाराज ३० दिवस राहिले. ऑक्टोबर महिन्यात महाराजांनी पॅरिस येथे २७ दिवस वास्तव्य केले. सयाजीराव ७ महीने २१ दिवसांच्या या प्रवासावरून १३ नोव्हेंबर १९२१ ला बडोद्यास परतले.

## चौदावा प्रवास : १९२२

महाराजांचा चौदावा युरोप दौरा १ एप्रिल १९२२ ते २५ नोव्हेंबर १९२३ असा १९ महीने २५ दिवसांचा होता. सयाजीराव परदेशात पोहोचल्यानंतर सुरुवातीला पॅरिसमध्येच १५ एप्रिल ते १७ मे असे ३२ दिवस राहिले. तर लंडनमध्ये सयाजीरावांचे ३० दिवस वास्तव्य होते. पुढे १९२३ च्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात ६० दिवस महाराजांचा मुक्काम पॅरिसमध्ये होता. सयाजीरावांनी स्वित्झर्लंडमध्ये ३३ दिवस व्यतीत केले. ९ नोव्हेंबर १९२३ ला महाराज भारतात परतण्यासाठी पॅरिसहून निघाले.

## पंधरावा प्रवास : १९२४

संधीवाताने त्रस्त सयाजीराव उपचार व हवा बदलासाठी २६ एप्रिल १९२४ ला मुंबईतून युरोपला जाण्यासाठी निघाले. पॅरिसमध्ये डॉ. विदाल आणि डॉ. वॅक्यूज यांनी महाराजांची

वैद्यकीय तपासणी करून आहारासंबंधी काही सूचना केल्या. पॅरिस वास्तव्यात महाराजांनी पंजाब हायकोर्टाचे न्यायाधीश आणि भारतीय कार्यकारी मंडळाचे सदस्य मोहमंद रफीक आणि श्री. इब्राहीम करीम भाई यांना भेटीसाठी बोलविले. लंडनमध्ये ब्रिटिश साम्राज्य असणाऱ्या सर्व प्रांत व देशांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये भारताच्या प्रत्येक विभागाचे स्वतंत्र दालन होते. त्यापैकी एक बडोद्याचेही होते. या प्रदर्शनातील अंतर्गत रस्त्यांची असणारी १५ मैल लांबी या प्रदर्शनाची भव्यता दर्शवते. महाराज आणि महाराणींनी या प्रदर्शनाला पाच वेळा भेट दिली.

महाराणी चिमणाबाई कारमधून लंडनहून येताना रस्सेलच्या स्थानिक बाजारात त्यांचा अपघात झाला. या अपघातात खिडकीच्या काचा महाराणींच्या चेहऱ्यावर लागल्याने तीन-चार जखमा झाल्या. या अपघातानंतर अपघातात गाडीतील लोकांना काचा लागू नयेत अशा पद्धतीने गाड्यांच्या काचांची फिटिंग करण्यात आली. महाराजांसोबत गेलेल्या शिरगावकरांनी लंडनमध्ये ऑईल इंजिनिअरबरोबर कूपनलिका आणि तेल शोध कार्याबद्दल चर्चा केली. काही दिवसांनी महाराजांनी शिरगावकरांना खासगी कारभारी म्हणून काम करण्याची जबाबदारी सोपवून भारतात परतण्याची आज्ञा दिली.

महाराजांनी पॅरिस येथील पाश्चर संशोधन संस्थेला दिलेल्या भेटीवेळी औषध निर्मितीपासून विविध विषांचा उपयोग औषध म्हणून कसा केला जातो याची माहिती करून घेतली.

सप्टेंबरमध्ये महाराजांना फ्रेंच भाषा शिकण्याची इच्छा झाल्याने त्यांना व कुटुंबीयांना फ्रेंच भाषा शिकवण्यासाठी कु. लक्स यांची तात्पुरती नेमणूक केली. पुढे १६ ऑक्टोबर १९२४ ला लक्स यांना नोकरीत कायम करण्यात आले. वास्तूतज्ञ ॲबडेन स्टॉक यांनी डिझाईन केलेली फ्रान्समधील उत्तर विभागीय रेल्वे कर्मचाऱ्यांची आधुनिक आणि सर्व सोईंनीयुक्त वसाहत पाहण्यासाठी महाराज गेले होते.

सयाजीरावांनी ७ डिसेंबर १९२४ ला पॅरिसमध्ये एक घर विकत घेतले. महाराजांनी फ्रेंच दुभाषकाकडून घरासंबंधी सर्व कागदपत्रे समजून घेतल्यानंतरच त्यावर सह्या केल्या. महाराजांनी भारतातून सुट्टीला लंडनमध्ये आलेल्या व्हाइसरॉय अर्ल रिडींग यांची भेट घेतली. ब्रिटिश इंडियन युनियन आणि नॉर्थ ब्रुक सोसायटी यांनी लॉर्ड रिडींग यांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. त्या सोहळ्यास महाराज उपस्थित होते आणि तेथे त्यांनी प्रभावी भाषणही केले.

यावेळी महाराजांचा रस्सेलमधील मुक्काम एकूणच घाईगर्दीचा व धावपळीचा होता. बडोदे राज्यातील प्रश्न, पॅरिसच्या घराची दुरुस्ती, सजावट, त्याचवेळी इंग्लंडमधील स्थावर संपत्तीचा निर्णय या बाबीमध्ये महाराज व्यस्त राहिले. त्याचवेळी पाहुणे, मेजवानी, वाटाघाटी याही बाबी महत्वाच्या होत्या. श्री. विजेरी यांच्या राज्यासाठी सेवेचा प्रश्न, शिल्पकार बोस यांच्या सेवाशर्ती व इतर वाटाघाटी. आत्मचरित्रासाठी नेमलेल्या श्री.

होम यांना श्री. पी. डब्ल्यू. सार्जंट यांनी महाराजांबरोबर बडोदे येथे जाणे निश्चित करणे. श्री. होम व सार्जंट यांना महाराजांच्या चरित्रासाठी लागणारे साहित्य, चित्र वगैरे बाबी जमवणे आणि लिखाण करण्याचे काम सोपवणे. पॅरिस येथे घेतलेल्या घराचे सजावट व इतर कामांबद्दल निर्णय घेऊन त्याप्रमाणे सूचना देणे, लंडन येथे सोलोमन यांच्याकडून स्वतःची दोन व्यक्तिचित्रे तयार करवून घेणे, महाराजांच्या पुतळ्यांसाठी मापे देणे, दिल्लीतील बंगल्याच्या कामाचे नकाशे, रेखाचित्रे व संकल्प चित्रे बघून निर्णय घेणे, त्या निर्णयाअगोदर वास्तूतज्ज्ञांबरोबर बैठका घेवून चर्चा करणे अशी सर्व कामे एकाचवेळी रस्सेल मुक्कामात चालू होती. या कामांच्या यादीवरून सयाजीरावांच्या कामाची व्याप्ती आणि पद्धत लक्षात येते.

इंग्लंडमधील कवी मंडळ दरवर्षी आपला वार्षिक उत्सव साजरा करत असे. या मंडळाने १९२५ चा उत्सव अल्दवर्थ येथील महाराजांच्या बंगल्यात साजरा करण्यास सुचविण्यात आले. त्यानुसार ११ जुलैला हा उत्सव महाराजांच्या बंगल्यात साजरा झाला. यावेळी महाराजांतर्फे कवी मंडळास उपहार देण्यात आला होता. इंग्लंडमधील रस्सेल आणि अल्दवर्थ येथील निवासस्थानांवर होणारा अनाठायी खर्च लक्षात घेवून सयाजीरावांनी हे बंगले विकण्याचा निर्णय घेतला. देसाईंनी

दिलेल्या अहवालानुसार अल्दवर्थ येथील बंगला २५,००० पौंड तर रस्सेल येथील बंगला ३०,००० पौंडांना विकण्याचे ठरले. परंतु अल्दवर्थ येथील बंगला योग्य किंमत न मिळाल्याने विकला गेला नाही. तर रस्सेल येथील बंगला ३०,००० पौंडांना विकला गेला. पॅरिसमध्ये असताना सयाजीरावांनी श्री. एस. एस. गायकवाड यांची चिटणीस म्हणून नेमणूक केली. रॉजर अँड गॅलट या अत्तराच्या कारखान्याला महाराजांनी भेट दिली. अत्तर तयार करण्यापासून ते वितरणापर्यंतची सर्व प्रक्रिया महाराजांनी बारकाईने समजून घेतली. महाराज आपली १८ महिने २५ दिवसांची ही युरोपवारी संपवून २० नोव्हेंबर १९२५ ला भारतात परतले.

## सोळावा प्रवास : १९२६

सयाजीराव १३ मार्च १९२६ ला इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंडच्या दौऱ्यावर निघाले. यावेळी सयाजीराव पॅरिस येथील आपल्या नवीन घरात राहिले होते. परंतु पॅरिसमधील वास्तव्यात त्यांना संधीवाताचा प्रचंड त्रास झाला. जवळजवळ अडीच महीने महाराज या आजाराने त्रस्त होते. महाराजांनी डॉ. मोडक यांना फ्रेंच डॉक्टर काही रोगांचा प्रतिबंध व उपाय कसा करतात याचा अभ्यास करण्यासाठी काही काळ पॅरिसमध्ये थांबवले. बुगेस येथील कॉन्वेंट भेटीवेळी सयाजीरावांनी तेथील कार्यशाळेस काही रक्कम दान दिली. रॉयल ॲकॅडमी ऑफ लंडनला

सयाजीरावांनी भेट दिली. येथील फाइन आर्टचे वार्षिक प्रदर्शन महाराज तेथे पोहोचण्यापूर्वीच संपले होते. परंतु या प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आलेले श्री. सोलेमन यांनी बनविलेले सयाजीरावांचे पूर्णाकृती पोर्ट्रेट महाराजांना बघता यावे म्हणून न हलवता त्या ठिकाणीच ठेवण्यात आले होते.

२७ ऑगस्टला महाराजांनी पीकॅडली हॉटेल येथे युरोपहून ओखा बंदरास नियमित जहाज सेवा सुरू करण्यासंदर्भात लंडनमधील विविध अधिकाऱ्यांसोबत एक परिषद आयोजित केली. यानंतर काही दिवसांनी याच विषयासंदर्भात दुसरी बैठक पार पडली. याचे फलित म्हणून एका मोठ्या जहाज कंपनीचे प्रमुख  सर जॉन केलरमन यांनी कोणत्याही अटीशिवाय ओखा बंदरास दरमहा स्टीमर सर्व्हिस देण्याचे मान्य केले. २१ सप्टेंबरला आणखी एक बैठक झाली. या बैठकीत प्रामुख्याने ओखा बंदर अधिक कार्यक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी अधिकच्या सोयी सुविधा, जसे की, बंदरास जोडणारे रस्ते, गावाचे नियंत्रण, बडोद्यास मीटर गेज रेल्वेने जोडणे यावर चर्चा झाली.

महाराज युरोपहून भारतात परतताना जहाजामध्ये त्यांची भेट भारत सरकारच्या निमंत्रणावरून भारतात यौनरोग प्रतिबंध व उपाययोजनेच्या संदर्भात व्याख्याने व प्रदर्शने आयोजनासाठी येत असलेल्या श्रीमती नेविल रोल्फ आणि डॉ. लेस यांच्याशी झाली. महाराजांनी त्यांना परतण्यापूर्वी बडोद्यास येण्याचे निमंत्रण दिले. त्यावर त्यांनी मार्च १९२७ मध्ये येण्याचे आश्वासन

दिले. १९ नोव्हेंबर १९२६ ला महाराज मुंबई बंदरावर पोहोचले. महाराजांचा हा प्रवास ८ महीने ८ दिवसांचा होता. या परदेश वास्तव्यात महाराजांना आलेल्या व त्यांनी पाठवलेल्या पत्रांची एकूण संख्या २,००३ इतकी आहे. यावरून महाराजांनी परदेशात असताना केलेल्या कामाची कल्पना येते.

## सतरावा प्रवास : १९२७

९ एप्रिल १९२७ ते १३ जानेवारी १९२८ अशी ९ महीने ४ दिवसांची महाराजांची ही युरोप वारी होती. १७ जूनला महाराजांच्या इच्छेनुसार रा. ब. अंबेगावकर आणि पानेमेंगलोर हे प्रो. विजेरी यांना भेटण्यासाठी केंब्रिज विद्यापीठात गेले. यावेळी महाराजांच्या भाषणांच्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या संदर्भात त्यांनी चर्चा केली. सयाजीराव जिनिव्हात असताना त्यांना एका स्विस वर्तमानपत्रातून बडोद्यात आलेल्या पुराची बातमी समजली. या बातमीने व्यथित झालेल्या महाराजांनी तातडीने बडोद्याच्या दिवाणांना तार करून “संकटात सापडलेल्यांना सर्वतोपरी मदत करावी.” असा आदेश दिला. महाराजांनी ९ ऑगस्टला पूरग्रस्तांच्या निधीसाठी १ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. राजपुत्र धैर्यशिलराव यांनी स्वत: लक्ष घालून पूरग्रस्तांना सहकार्य करण्याची सूचना महाराजांनी तार करून दिली. त्याचबरोबर नवीन घरे बांधताना संडासची, त्यासाठी पाण्याची योग्य व्यवस्था असणारी आधुनिक घरे बांधावीत अशाही सूचना महाराजांनी केल्या. यावेळी सयाजीरावांच्या

आदेशानुसार गरजू लोकांना खिचडी पुरवण्यात आली. कोपेनहॅगन येथील सरकारी दुग्ध उत्पादन केंद्राला महाराजांनी भेट दिली. तेथे त्यांनी मलई, लोणी आणि चिज बनवण्याची प्रक्रिया समजून घेतली. महाराजांनी शर्यतीच्या घोड्यांची पागा सुरू करण्याचा निर्णय घेतला व शर्यतीच्या घोड्याच्या पागेचे व्यवस्थापक म्हणून श्री. एस. एस. गायकवाड यांची नेमणूक केली.

## अठरावा प्रवास : १९२८

महाराजांचा अठरावा परदेश प्रवास फ्रान्स, स्वित्झर्लंड, स्वीडन, डेन्मार्क, जर्मनी येथे ११ एप्रिल १९२८ ते २८ डिसेंबर १९२८ असा ८ महिने १७ दिवसांचा होता. पॅरिसमध्ये असताना महाराजांना पॉलिटेक्निक येथे सेरेमनी द ला पोझ ज्या ठिकाणी फ्रेंच राष्ट्राध्यक्षही उपस्थित होते त्या समारंभाचे आमंत्रण होते. महाराज २७ जूनला इंग्लंडमधील दि एंपायर गार्डन पार्टीला उपस्थित राहिले. या ठिकाणी सम्राट व सम्राज्ञीही उपस्थित होते. ती संपूर्ण दुपार महाराजांनी सम्राटांसोबत व्यतीत केली. २८ डिसेंबरला या दौऱ्यावरून भारतात आल्यावर महाराजांनी २९ तारखेला नवसारी पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन केले.

## एकोणिसावा प्रवास : १९२९

महाराज १६ मार्च १९२९ ला मुंबईहून युरोपसाठी निघाले. १४ एप्रिलला सयाजीरावांनी मेमर्स येवेल ब्रॅंचच्या श्री. ब्रॅंच आणि

त्यांचे पॅरिसमधील कायदेपंडित सॉलिसिटर यांची भेट घेतली. महाराजांनी १ मे ला पॅरिस विद्यापीठातील थोर पौर्वात्य अभ्यासक प्रा. सिल्व्हीन लेव्ही यांची भेट घेतली. प्रा. लेव्ही यांना प्राचीन संस्कृत साहित्य आणि वैदिक काळातील भारतीय संस्कृतीच्या संशोधनविषयक कार्य व भारतीय विद्यार्थ्यांमध्ये खूपच रस होता. यावेळी महाराजांनी 'इन्स्टिट्यूट द ला सिव्हिलिझासियॉं इंदियन'ला २,००० पौंडांची देणगी दिली.

या रकमेच्या व्याजातून भारतीय संस्कृती व जीवनपद्धतीशी संबंधित कोणत्याही विषयावर अभ्यास करणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात असे. फ्रांस, हॉलंड, जर्मनी आणि अमेरिका यासारख्या देशांमध्ये सात वर्षांचा अनुभव असलेले शेतीतज्ञ डॉ. लिखिते यांना महाराजांनी बडोद्याच्या सेवेत रुजू करून घेतले. बडोदा संस्थानातील ज्या शाळा व शैक्षणिक संस्थांवर खूप निधी खर्च करूनही लोक त्यांचा पुरेसा फायदा घेत नाहीत, त्या संस्थांवर निधी खर्च करण्याच्या धोरणाला महाराजांचा विरोध होता. त्यामुळे पॅरिसमध्ये असताना महाराजांनी शिक्षण विभागाला त्यावेळी अस्तित्वात असलेल्या धोरणाचा व्यापक आढावा घेण्याविषयी तपशीलवार सूचना देवून, जे काही दोष आहेत त्यामध्ये तात्काळ सुधारणा करण्याचा आदेश दिला.

सयाजीरावांनी इंग्लंडमध्ये स्काऊटसंदर्भातील महत्वाच्या बैठकीला हजर राहण्यासाठी बडोदा संस्थानने श्री. दवे यांच्या

नेतृत्वाखाली पाठविलेल्या स्काऊट्सची भेट घेतली. त्यावेळी हजर असलेल्या १० मुलांना २० पौंडांची देणगीही महाराजांनी दिली. डॉक्टर मोडक व श्री. काटदरे यांना पिटमनर्स कॉलेजमध्ये जेमॉलॉजी (रत्नांच्या शास्त्राच्या) अभ्यासक्रमाविषयी चौकशी करण्यासाठी लंडनला पाठविले. महाराजांनी श्री. एस. आर. दिवेकर या संस्कृत पंडिताशी बडोद्यातील कायद्याच्या शब्दकोशात संस्कृत आणि मराठी शब्द वापरणे किंवा पर्यायी नवीन आणि समर्पक शब्दप्रयोगांचा समावेश करण्याविषयी सविस्तर चर्चा केली. महाराजांनी १९२८ मध्ये लंडनचे मेसर्स कार्टियर आणि पॅरिसच्या असोसिएट यांच्यासोबत बडोदा संस्थान बहुमूल्य रत्नांची खरेदी कार्टियर यांच्याकडून करेल असा करार केला होता. परंतु या बंधनामुळे संस्थानची गैरसोय होत असल्याचे सयाजीरावांच्या लक्षात आले. त्यांनी जॅक कार्टियर यांची भेट घेवून या करारातील शर्तींचा पुनर्विचार करावा आणि त्यामध्ये योग्य ती सुधारणा करावी असे सांगितले. काही काळाने या करारात सुधारणा करण्यात आल्या. महाराज ९ महीने २६ दिवसांचा हा दौरा संपवून १० जानेवारी १९३० ला मुंबईत पोहोचले.

## विसावा प्रवास : १९३०

महाराजांची विसावी युरोपवारी १५ मार्च १९३० ते ९ फेब्रुवारी १९३१ अशी १० महीने २६ दिवसांची होती. या प्रवासात सयाजीरावांनी १५ ऑक्टोबरला बर्लिन ट्रेप्टो वेधशाळेला भेट

देवून २०० पौंडांची देणगीही दिली. या संस्थेने सयाजीरावांना संस्थेचे आश्रयदाते बनविले. १२ नोव्हेंबर १९३० ला ब्रिटनचे सम्राट यांच्या हस्ते हाऊस ऑफ लॉर्डसच्या दालनामध्ये गोलमेज परिषदेची सुरुवात झाली. यावेळी ब्रिटनच्या पंतप्रधानांनंतर सयाजीरावांनीही भाषण केले. या परिषदेच्या ८, ९, १२, १४ आणि १५ जानेवारीला झालेल्या सर्व बैठकांना सयाजीराव हजर होते. १९ जानेवारी १९३१ ला गोलमेज परिषदेच्या समाप्तीवेळीही सयाजीरावांनी भाषण केले. सयाजीरावांनी सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानामुळे त्यांना दि रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ या संस्थेची फेलोशिप प्रदान करण्यात आली. महाराजांनी या संस्थेला त्यांच्या व्यक्तीगत निधीतून १,००० पौंडांची देणगी दिली.

या दौऱ्यात महाराजांनी प्रा. अलेक्झांडर गिडोनी यांना कलेवर आधारित एक पुस्तक लिहिण्याची सुचना केली. शाळेत वापरण्यासाठी या पुस्तकाचा हिंदीमध्ये अनुवाद करण्याची महाराजांची इच्छा होती. लंडनमध्ये महाराजांनी “ब्रिटिश स्पोर्टसमन” या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी सहाय्य म्हणून त्या पुस्तकाच्या एका संचाला ५२५ पौंडांची ऑर्डर दिली. सयाजीरावांनी परदेशात स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या मुंबईच्या जी. बी. म्हात्रे या विद्यार्थ्याला २० पौंडांची मदत केली. त्याचबरोबर व्ही. माधवराव आणि भुवन मोहन मंडल या भारतीय विद्यार्थ्यांना परतीची तिकिटे महाराजांकडून काढून

देण्यात आली. कलकत्ता विद्यापीठातील पदवीधर श्री. मंडल या दलित विद्यार्थ्याला कायद्याच्या अभ्यासासाठी १२५ पौंडांची मदत केली. दि ईस्ट इंडिया असोसिएशन, ३ व्हिक्टोरिया स्ट्रीट, लंडन या संस्थेचे अध्यक्ष सर फ्रान्सिस यंगहजबंड यांना महाराजांनी युरोप खंडातील अभ्यासकांना लंडनमध्ये भारतीय कला व संस्कृती या विषयावर व्याख्याने देण्यासाठी प्रतिवर्षी १०० पौंड प्रमाणे ५ वर्षे देणगी दिली. सयाजीरावांनी दिलेल्या या निधीचे नामाभिधान 'दि महाराजा गायकवाड लेक्चर फंड' असे करण्यात आले. सयाजीरावांनी लंडन विद्यापीठाचे पी.एच.डी. असलेले डॉ. लेकासुंदरम यांना भारताच्या आंतरराष्ट्रीय स्थानाविषयी लिहीत असलेल्या पुस्तकासाठी ३०० पौंडांची रक्कम दिली.

## एकविसावा प्रवास : १९३१

महाराज फ्रान्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड, जर्मनी, इटली, स्कॉटलँड या देशांच्या सफरीवर २३ मे १९३१ ला निघाले. यावेळी महाराजांनी श्री. ऐतकेन यांनी तयार केलेल्या आधुनिक घटनेच्या (संविधान) नोंदी, डायसींचे घटनात्मक कायदा आणि अनेक मराठी-इंग्रजी पुस्तकांचे वाचन केले. महाराजांनी बडोद्याचे डॉ. के. जी. दास यांना त्यांच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी १०५ पौंडांची आर्थिक मदत दिली. लंडनमधील दुसऱ्या गोलमेज

परिषदेच्या सत्राची सुरुवात ७ सप्टेंबर १९३१ ला झाली. महाराजांनी या परिषदेच्या २१ व्या बैठकीमध्ये छोटेसे भाषणही केले. २५ सप्टेंबर १९३१ ला श्रीमती सरोजिनी नायडू यांच्यासह महात्मा गांधींनी लंडनमध्ये महाराजांची भेट घेतली. महाराजांनी युरोपीयन गृहस्थ श्री. आर. एम. टिसडेल यांची नेमणूक एडीसी म्हणून तर श्री. रोमन यांची नियुक्ती बडोदा महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून केली. सयाजीरावांनी झुरीच येथील प्रसिद्ध तंत्रशिक्षण महाविद्यालयाला भेट दिली.

गस्टॉडमधील वास्तव्यात सयाजीरावांनी ५६ आदेश पारित केले. त्याचबरोबर लहान बंधू संपतरावांना कौटुंबिक आठवणींचे पुस्तक लिहिण्याची विनंती केली. याचवेळी महाराजांनी कायदा शब्दकोश तयार करण्याचा, सुक्तीसंग्रह करण्याचा, नीतिशास्त्राच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद जसे की, जोन्सच्या 'नीतिशास्त्राचे तत्व' हे पुस्तक पूर्ण करण्याचे आदेश दिले. २७ मार्च १९३२ ला महाराजांनी लंडनमध्ये भारतीय विद्यार्थ्यांच्या केंद्रीय संघटनेला १५० पौंडांची देणगी दिली. पॅरिसमध्ये असताना महाराजांना कोल्हापूरला होणाऱ्या १५ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान देणारी तार मिळाली. सयाजीरावांनी हे आग्रहाचे आमंत्रण आनंदाने स्वीकारले. महाराज १८ महिने १३ दिवसांचा हा युरोप प्रवास संपवून ५ डिसेंबर १९३२ ला मुंबईत आले.

## बाविसावा प्रवास : १९३३

महाराज आपल्या बाविसाव्या युरोप दौऱ्यावर २२ मे १९३३ ला मुंबईहून निघाले. सयाजीराव लंडनमध्ये असताना २५ जून १९३३ ला डॉ. आंबेडकरांनी त्यांची भेट घेतली. १५ जुलैला लिंडफिल्ड येथे महाराजांची सर विल्यम व श्री. बनेट यांच्यासोबत भारतातील प्रसारणाच्या समस्यांबद्दल चर्चा झाली. यावेळी सयाजीरावांनी बडोद्यात आकाशवाणी केंद्र उभारण्याच्या शक्यतेवरदेखील चर्चा केली. या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे व नकाशे महाराजांना दाखवून अशी प्रणाली सुरू करण्याचा फायदा समजावून सांगण्यात आला. सयाजीरावांनी श्री. बनेट यांना याविषयी दिवाणांशी चर्चा करण्याचे आदेश दिले. यानंतर लगेचच १८ जुलैला महाराजांनी लंडनमधील आकाशवाणी केंद्राला भेट दिली.

२७ ऑगस्टला सयाजीरावांच्या हस्ते शिकागो येथील जागतिक सर्वधर्म परिषदेचे उद्घाटन झाले. या परिषदेमध्ये विविध देशातील विविध धर्मांचे २६,००० प्रतीनिधी उपस्थित होते. यावेळी सयाजीरावांनी केलेले भाषण अमेरिकेतील वृत्तपत्रे व माध्यमांमध्ये प्रसारित करण्यात आले. विश्व संमेलनाचे अध्यक्ष रुफूस डावेस यांच्या निमंत्रणावरून महाराजांनी २८ ऑगस्टला शिकागो येथेच भरलेल्या विश्व संमेलनाला भेट दिली. न्यू मेक्सिकोमधील भारतीय तरुणांना महाराजांनी १०० डॉलरची देणगी दिली. महाराजांनी लॉस एंजिल्स येथील केट शाळेला

भेट दिली. सयाजीरावांनी प्राचार्यांकडून शाळेच्या इमारती संदर्भातील आराखडे मागून घेतले. ही शाळा पाहून महाराज अशाच प्रकारची शाळा बडोद्यात उभी करण्याचा विचार करत होते. महाराज ही ५ महीने ३ दिवसांची महत्वपूर्ण परदेशवारी संपवून २३ ऑक्टोबर १९३३ ला मुंबईत पोहोचले.

## तेविसावा प्रवास : १९३४

९ एप्रिल १९३४ ते ७ नोव्हेंबर १९३५ असा १८ महिने २९ दिवसांचा महाराजांचा हा युरोप प्रवास होता. इटलीत असताना सयाजीरावांनी 'गायकवाड ऑफ बडोदा ग्रेटर इंडिया रिसर्च एक्सपीडिशन' या डॉ. क्वॉरिच वेल्स यांच्या संस्थेला ५०० पौंडांचे अनुदान मंजूर केले. ऑस्टेरली पार्क, एल्डवर्थ येथील भारतीय जिमखान्याला महाराजांनी १२५ पौंडांची देणगी दिली. लंडनमधून महाराजांनी १०६ पौंडांचा कॅमेरा विकत घेवून कोल्हापूरच्या राजाराम महाराजांना भेट दिला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना सयाजीरावांनी व्हाइट हाऊसवर भेट दिली. सयाजीरावांनी केर्न इन्स्टिट्यूट, लंडन, हॉलंडला ४५० पौंडांची देणगी दिली. त्यातील ५० पौंड संस्थेला तर उर्वरित डच ईस्ट इंडिज सरकारला दिले. कारण त्यांनी बाली येथील दस्ताऐवज जपून ठेवण्याच्या केलेल्या महत्वपूर्ण कामामुळे भारतीय पुरातन संस्कृतीवर प्रकाश टाकण्याचे काम झाले.

गस्टाडच्या मुक्कामात सयाजीरावांनी अनेक धार्मिक पुस्तके वाचली. त्यांनी धर्म अभ्यास करणाऱ्या एका संस्थेला ५ गिनी

मदत दिली. डॉ. सय्यद मुस्तफा अली हे हॅले विद्यापीठात डॉक्टरेट करत होते. अरबी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी ते कैरोला आले होते. महाराजांनी अली यांना कैरोतील शिक्षण पूर्ण करण्यासाठी १०० पौंडांची मदत केली. ३० मार्च १९३५ ला सयाजीरावांनी रजत महोत्सवी वर्षासाठी ५०,००० रुपयांचे भाग भांडवल दिले, तर लॉर्ड चेम्सफोर्ड यांच्या पुतळ्यासाठी १,००० रुपयांचे अनुदान दिले. पॅरिसमधून २२ मार्च १९३५ ला महाराजांनी बडोद्यात दिवाणांना तार करून प्रो. बूच यांना तुलनात्मक धर्म अभ्यासासाठी पाठविण्याचे आदेश दिले. लंडनमध्ये असताना महाराजांनी पूरोहित स्वामी यांच्या 'गीता' या अनुवादीत पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आणि या पुस्तकाच्या १२ प्रतीही विकत घेतल्या.

महाराजांनी भारतात चालवलेल्या ग्रंथालय चळवळीमुळे त्यांच्या सन्मानाप्रीत्यर्थ लंडनमध्ये 'द लायब्ररी रिव्ह्यू अँड फ्रेंडस'तर्फे स्नेहभोजनचा कार्यक्रम ठेवला. सयाजीरावांनी भारतीय कलेचा अभ्यास करणाऱ्या इंडियन सोसायटीला मागील ५ वर्षे देत असलेली देणगी आणखी २ वर्षे सुरू ठेवण्याचे आदेश दिले. ११ जून १९३५ ला महाराजांना हॉलंड येथील केने विद्यापीठाचे मानद सभासदत्व देण्यात आले. १ जुलै १९३५ ला झालेल्या विश्वधर्म परिषदेच्या सभेला महाराज उपस्थित होते. या सभेतून परतल्यावर महाराजांनी सभेचे अध्यक्ष सर फ्रान्सिस यंगहस्बंड यांना जुलै १९३६ मध्ये भरणारी विश्वधर्म परिषद

लंडन येथेच व्हावी आणि या काळात कमी होत चाललेल्या पारसी धर्मावर कोणीतरी बोलावे असे पत्राद्वारे सुचविले. पुढे २५ जुलै १९३५ ला सयाजीरावांनी १९३६ मध्ये होणाऱ्या या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय सर्वधर्म परिषदेसाठी मदत म्हणून यंगहस्बंड यांच्याकडे १०० पौंडांचा धनादेश दिला.

२७ ऑगस्ट १९३५ च्या विश्वशांती दिवसासाठी निघणाऱ्या 'एप्रिसिएशन' या मासिकामध्ये सयाजीरावांच्या राज्यकारभाराचा आढावा दासगुप्त यांनी घेतला होता. महाराजांनी पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला येणाऱ्या अप्पासाहेब घोरपडे यांच्या चिरंजीवांना महिन्याला २० पौंड शिष्यवृत्ती देवु केली. १२ ऑगस्टला सयाजीरावांनी भारताचे ब्रिटिश राजचे सचिव लॉर्ड झेटलॅंड यांना पत्र लिहून सर्व भारतीय खेळांचे विश्वसंग्रहात्मक पुस्तक लिहिण्याची सूचना केली. नितीतत्त्वांना वैज्ञानिक विचारांशी जोडून आधुनिक जीवनात त्याचा उपयोग करण्याच्या उद्देशाने इस्ट्बोर्न येथील डॉ. स्टॅन्टन कॉयट यांनी चालवलेल्या चळवळीसाठी सयाजीरावांनी मदत म्हणून १०० पौंडांचा धनादेश दिला. महाराजांनी भारतात केलेल्या ग्रंथालय चळवळीसंदर्भातील कामाबद्दल लायब्ररी असोसिएशनच्या कौन्सिलने त्यांना मानद उपाध्यक्षपद स्वीकारण्याच्या केलेल्या विनंतीनुसार सयाजीरावांनी २५ ऑक्टोबर १९३५ ला हे पद स्वीकारले.

## चोवीसावा प्रवास : १९३६

महाराज आपल्या चोवीसाव्या युरोप दौऱ्यासाठी ११ एप्रिल १९३६ ला मुंबईहून रवाना झाले. ३ जुलै १९३६ ला लंडनमधील जागतिक सर्वधर्म परिषदेच्या उद्घाटन सत्रात सयाजीरावांनी उद्घाटनपर भाषण केले. ज्याची दखल जगातील सर्व वृत्तपत्रांनी घेतली. महाराजांनी मानवतेसाठी केलेले काम आणि त्यांना ६० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल 'विश्वाचे विश्व संगोपन' या संस्थेच्या सदस्यांकडून त्यांच्या सह्या असणारे निवेदन सयाजीरावांना देण्यात आले. ३१ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान सयाजीराव बर्लिन येथील वास्तव्यास होते. येथे होणारे ऑलिंपिक सामने पाहणे हे बर्लिन वास्तव्याचे वैशिष्ट्य होते. याच वर्षी बडोदा संस्थानने केलेल्या ऑलिंपिक प्रवेशामुळे महाराज खूप आनंदी होते. ऑलिंपिकच्या प्रभावामुळे सयाजीरावांनी बडोदा संस्थानात शारीरिक शिक्षण अनिवार्य केले. पॅरिसमध्ये असताना महाराजांनी सेकंड बटलर म्हणून आर्मीन हर्लीमॅन यांची नियुक्ती करून त्यांना लवकरात लवकर बडोद्याला जाण्याचा आदेश दिला. सयाजीराव ७ महिने १४ दिवसांच्या या परदेश दौऱ्यानंतर २४ नोव्हेंबर १९३६ ला भारतात परतले.

## पंचवीसावा प्रवास : १९३६

पहिल्या महायुद्धानंतर इम्पेरियल एअरवेज सेवेने भारत ते इजिप्त विमान सेवेचे उद्घाटन केले, त्याचवेळी महाराजांनी या हवाई मार्गाने प्रवास करण्याचे ठरवले होते. सयाजीरावांची

ही जुनी इच्छा पंचविसाव्या परदेश दौऱ्यावेळी पूर्णत्वास आली. ते १९३६ मध्ये भारतातून इजिप्तला विमानातून गेले. सयाजीराव १५ डिसेंबर १९३६ ते ३० नोव्हेंबर १९३७ दरम्यान ११ महिने १७ दिवस परदेश दौऱ्यावर होते. यावेळी महाराजांचा मुक्काम पहिल्यांदा इजिप्तला होता. महाराजांनी लक्सौरमधील मोजक्या पण मुख्य स्थळांना भेटी दिल्या. परंतु या स्थळांना भेट देण्यापूर्वी किंवा दिल्यानंतर सयाजीराव त्या स्थळासंदर्भातील माहिती असणारी विविध पुस्तके वाचत असत. सयाजीरावांनी आसुअनमधील सरकारी तांत्रिक शाळेला भेट दिली. बडोद्यातील कलाभवनसारख्या असणाऱ्या या शाळेतील मोटारींचे डिझाईन बनविण्यास व त्यांचे उत्पादन करण्यास शिकविल्या जाणाऱ्या मोटार यांत्रिकी विभागाचे अनुकरण भारतात करण्याचा विचार सयाजीरावांनी केला.

सयाजीराव इंग्लंडमध्ये देअर मॅजेस्टीस यांचा राज्याभिषेक सोहळा आणि इम्पेरियल कॉन्फरन्समध्ये भारताचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. इम्पेरियल कॉन्फरन्सच्या उद्घाटन प्रसंगी झालेल्या प्रमुख प्रतिनिधींच्या भाषणात सयाजीरावांचेही भाषण होते. सयाजीरावांना ऑक्सफर्ड येथील युनिव्हर्सिटी रालेह क्लबच्या वार्षिक रात्री-भोजनप्रसंगी आमंत्रित केले होते. या क्लबमध्ये भाषण देणारे सयाजीराव हे पहिले भारतीय होते. इंग्लंडमधील वास्तव्यात सयाजीरावांनी या क्लबचे आणि

एथेनाउन, कार्लटन, युनायटेड सर्व्हिस, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अफेर्स, बुक्स कॅव्हेलरी, एम. सी. सी यासारख्या प्रसिद्ध संस्था-संघटनांचे मानद सदस्यत्व स्वीकारले. १० जून १९३७ ला केंब्रिज विद्यापीठातर्फे सयाजीरावांना एल. एल. डी. ही पदवी देण्यात आली.

विस्बादेन येथील गोल्फ क्लब हे महाराजांचे आवडते ठिकाण होते. त्यांनी येथील खेळाडू आणि प्रशिक्षकांसाठी असलेल्या जागेच्या (पॅव्हेलियनच्या) दुरुस्तीसाठी २०० मार्क्सची देणगी दिली. नॉर्वेतील बर्गन या शहरातील वस्तुसंग्रहालयाला भेट दिल्यानंतर सयाजीरावांनी आपल्या अधिकाऱ्यांजवळ या संग्रहालयाच्या धर्तीवर बडोदा संग्रहालय उभारण्याची इच्छा व्यक्त केली. महाराज या प्रवासावरून भारतात परतल्यावर काही दिवस मुंबईत राहिले होते. त्यावेळी त्यांनी शिक्षणात मागासलेल्या वर्गासाठी असलेल्या श्री. शाहू छत्रपती बोर्डिंगचे संस्थापक साताराचे भाऊराव पाटील यांना भेटीसाठी बोलावून ३,००० रु. विश्वस्त निधीत ठेवण्यासाठी आणि १,००० रु. देणगी स्वरुपात दिले.

## सव्वीसावा प्रवास : १९३८

महाराज आपल्या शेवटच्या म्हणजे सव्वीसाव्या युरोप दौऱ्यास ११ मार्च १९३८ ला जोधपूर विमानतळावरून विमानाने निघाले. लंडनमध्ये असताना सयाजीरावांनी एकाचवेळी अनेक विषयांचा

अभ्यास करण्याचे ठरविले. महाराजांनी डॉ. नानावटी यांच्या मदतीने फिजीओलॉजीचा अभ्यास सुरू केला आणि वनस्पती शास्त्रासाठी नॅचरल हिस्ट्री म्युझियमचे प्रा. अलस्टोन यांची नियुक्ती केली. श्री. न्यूहॅम यांनी महाराजांना ट्रेवेलियन लिखित 'इंग्लंडचा इतिहास' वाचून दाखविला. तर सयाजीरावांनी स्वत: 'थेअरी ऑफ लेजिस्लेशन' हे बेंथम यांचे पुस्तक वाचले. परदेश दौऱ्यावेळी विविध खेळ खेळणे, नाटके, चित्रपट पाहणे, पुस्तके वाचणे या माध्यमातून महाराजांचे मनोरंजन होत असे. पुस्तके वाचण्याबरोबरच दौऱ्याची टिपणे तपासणे, त्यात दुरूस्ती करणे आणि काही बाबींची त्यात भर घालण्याचे कामही महाराज करत असत. महाराजांनी केनसाईन टोन सेंट्रल स्कूलला भेट देतेवेळी तेथील दोन-तीन गरीब विद्यार्थांना सुट्टीच्या काळात नार्वेत पाठविण्यासाठी १० डॉलर दिले होते.

हंगेरी येथील कुमारी ब्रुनेर व अन्य एक महिला चित्रकार अशा दोन व्यक्तींना बडोदा संस्थानच्या सेवेत रुजू करण्याच्या महाराजांच्या इच्छेनुसार श्री. न्यूहॅम यांनी त्यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली. ज्यामुळे या दोन महिला कलावंतांनी हिवाळ्यात बडोद्याला येण्याचा करार केला. लौसन्ने येथे असताना महाराजांनी लौसन्ने भागातील गरजूंना मदत करण्यासाठी असणाऱ्या क्वीन व्हिक्टोरिया ज्युबिली फंडाला २० पौंडांची देणगी दिली. महाराजांना प्रशस्त जागा आणि इंजिन असणारी

बोट हवी होती. महाराजांच्या इच्छेनुसार मेसर्स पंड्या व न्युहॅम यांनी अशी बोट खरेदी करून 'साल्टेअर' या जहाजाने भारतात पाठविली. लहान आकाराच्या 'शूटिंग रेंज' बद्दलची सर्व माहिती महाराजांना देण्यात आली होती. ही रेंज बडोदा कॉलेजमध्ये सुरू करावी असे महाराजांना वाटत होते. सयाजीराव ७ महिने २० दिवसांच्या परदेश वास्तव्यानंतर ३१ ऑक्टोबर १९३८ ला स्वदेशी परतले.

सयाजीरावांच्या २६ जगप्रवासाच्या अहवालांचा वरील धावता आढावा आपल्याला थक्क करून सोडतो. कारण एका राज्यकर्त्या राजाच्या जगप्रवासाचा इतिहास म्हणून जेव्हा आपण या अहवालांकडे पाहतो तेव्हा थक्क होऊन जातो. कारण या जगप्रवासांचा उद्देश हा जरी आरोग्यसंवर्धन असला तरी या जगप्रवासाने फक्त महाराजांनाच बौद्धिकदृष्ट्या समृद्ध केले असे नाही तर या जगप्रवासाने बडोदा संस्थानात जागतिक दर्जाची शासनव्यवस्था निर्माण केली. भारताला ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, भाषा, साहित्य, संस्कृती, शेती, उद्योग, आरोग्य अशा विविध क्षेत्रात बलशाही आणि आधुनिक बनविले. विशेष म्हणजे या सगळ्याचा बडोदा संस्थानानंतरचा लाभार्थी हा महाराष्ट्र आहे हेसुद्धा येथे लक्षणीय ठरते. सर्वात महत्वाचे म्हणजे एक राजा किती प्रजाहितदक्ष असू शकतो याची सर्वोच्च अनुभूती या अहवालातील तपशिलांवरून येते. एका अर्थाने शिवरायांनी पाहिलेल्या 'सुराज्य स्वप्नांचा' हा यशस्वी पाठलागच

होता. त्यामुळेच श्री. राजगोपालाचारी यांनी ‘भारतातील शिवरायांनंतरचा सर्वश्रेष्ठ राजा’ ही उपाधी सायाजीरावांना का दिली होती याचा जसा उलगडा होतो त्याचप्रमाणे ही उपाधी किती समर्पक होती हेसुद्धा अगदी सहजपणे स्पष्ट होते.

आजच्या भारतातील पर्यटन संस्कृतीचा पायाभूत उद्देश विचारात घेता ‘मौजमजा’ हेच तिचे सर्वसाधारण उद्दिष्ट असल्याचे दिसते. अपवादात्मक उदाहरण म्हणून अलीकडे तणावमुक्ती हे पर्यटनाचे प्रमुख उद्दिष्ट होताना दिसते. ‘ज्ञानप्राप्ती’ हा पर्यटनाचा उद्देश अजून भारतीय पर्यटन संस्कृतीच्या परिघावरसुद्धा आढळत नाही. या पार्श्वभूमीवर १०० वर्षांपूर्वी सयाजीराव सातत्याने ‘ज्ञानपर्यटन’ करत होते ही बाब अद्भुतच म्हणावी लागेल. महाराजांच्या जगप्रवासाच्या या अहवालांचा अजून एक महत्वाचा निष्कर्ष म्हणजे महाराज हे भारतीय पर्यटन संस्कृतीचे मुख्य उद्गाते होते असा सिद्धांत मांडण्याइतके भक्कम पुरावे सयाजीरावांच्या ‘प्रवासदृष्टीत’ सापडतात. प्रवासात जाताजाताही आपल्या नकळत ‘ज्ञानप्राप्ती’ होत असते. परंतु महाराजांच्या या २६ जगप्रवासांचा चिकित्सक वेध घेत असताना प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे महाराज सातत्याने सर्व क्षेत्रातील ‘सर्वोत्तम ज्ञानाचा’ सातत्याने शोध घेत होते हे लक्षात येते. याचे पुरावे जेव्हा आपण शोधू लागतो त्यावेळी महाराजांनी परदेशातील विविध संस्था, उद्योग यांना दिलेल्या अभ्यासभेटी, जगातील सर्व प्रमुख राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांपासून

ते लेखक, संशोधक, तत्वज्ञ, कलाकार इ. लोकांशी त्यांनी केलेली जाणीवपूर्वक चर्चा, जगातील प्रमुख विद्यापीठे आणि ग्रंथालयांना दिलेल्या भेटी, तेथे केलेल्या चर्चा आणि भाषणे इ. वरून सयाजीरावांच्या 'ज्ञानमार्गी' पर्यटनाचे प्रतिबिंब सातत्याने दिसते.

महाराजांच्या समकालीन भारतीय राजांच्या त्याचप्रमाणे शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या लोकांच्या परदेशातील कर्तबगारीचे किस्से गेल्या ६० वर्षांत भारतात सातत्याने चर्चिले गेले. परंतु आश्चर्यकारकरित्या सयाजीरावांच्या विश्वपर्यटनाचा कोणताही संदर्भ भारतातील या चर्चेत कानी पडत नाही. याचा स्पष्ट अर्थ इतकाच की आपली 'गॉसिप्स' संस्कृती अशा पर्यटनाला दोन पावलापुरती जागा उपलब्ध करून देत नाही. थोर शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी 'व्हिजन २०२०' चे स्वप्न पहिले होते. त्यांचे असे मत होते की भारत हा महासत्ता होईल. परंतु महासत्ता होण्यासाठी 'ज्ञानसत्ता' आवश्यक असते आणि ज्ञानसत्तेसाठी 'ज्ञानमार्गी' होऊन 'ज्ञानसाधना' करणे आणि समाजात ज्ञाननिष्ठा निर्माण करणे ही पूर्वअट असते. आपण या पूर्वअटींचे पालन करू शकलो नाही. परिणामी आपल्या महासत्ता होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जगाच्या 'हंगर इंडेक्स'मध्ये आपण पाकिस्तान, बांग्लादेश आणि इतर आफ्रिकन अप्रगत देशांच्याही खाली आहोत.

आपण सयाजीरावांच्या जगप्रवासाला आपला 'वाटाड्या' केले असता तर कलामसाहेबांनी पाहिलेल्या स्वप्नाला गवसणी घालण्याचे बळ आपल्या पंखाना मिळाले असते. हेच सयाजीरावांचे बलस्थान आहे. सयाजीराव हे भारतासाठी कायमच 'समकालीन आदर्श' ठरणार आहेत. त्यामुळे पुढची अनेक दशके सयाजीरावांच्या पुनर्वाचनाची नितांत गरज असेल. याचे कारण त्यांचे द्रष्टे नेतृत्व हे जसे आहे तसे किंवा त्याहूनही महत्वाचे म्हणजे त्यांची अखंड आणि प्रचंड ज्ञानसाधना हेसुद्धा आहे. म्हणूनच आपल्याला आपल्या उन्नतीसाठी सयाजीरावांच्या जगप्रवासाच्या अहवालांचे 'पारायण' सातत्याने करावे लागेल.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर,
  लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com